१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

तुमच्या मनातलं...!
www.lokshahilive.com

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/

Download Our Apps



पान 5 / विद्यार्थी मृत्यूच्या चौकशी...


जळगाव, मंगळवार, दि.१५ जुलै २०२५ | RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024-26 | • अंक -२४५ • पाने ६ • किंमत ३ रु.

# ... तर रक्षा खडसेंचे राज्य मंत्रिपद जाणार?

## ॲड. उज्वल निकमांची एन्ट्री खडसेंना भोवणार : राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण

**दीपक कुलकर्णी**
**लोकशाही न्यूज नेटवर्क**





प्रसिद्ध वकील उज्वल निकम यांची राष्ट्रपती नियुक्त राज्यसभा सदस्य म्हणून निवड झाली असून त्यांची लवकरच मंत्रिपदी वर्णी लागण्याची दाट शक्यता असल्याची चर्चा राजकीय गोटात जोर धरीत आहे. श्री. निकम यांना मंत्रिपद मिळाले तर सध्याच्या केंद्रीय युवक व क्रिडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांचा पत्ता कट होण्याची चिन्हे आहेत. राज्याचे संकटमोचक गिरीश महाजन आणि खडसे परिवाराचे सख्य नसल्याने ते या लढ्यात उडी घेण्याची शक्यता देखील बळावली आहे.

ॲड. उज्वल निकम यांना राज्यसभा खासदार म्हणून राष्ट्रपतींच्या नामनिर्देशनानंतर त्यांचा मंत्रीपदाचा मार्ग मोकळा होऊ शकतो, तर त्याचवेळी रक्षा खडसे यांचे राजकीय स्थान धोक्यात येवू शकते. ॲड. उज्वल निकम हे राष्ट्रपतींच्या नामनिर्देशनाने दि. २१ जुलै २०२५ पासून राज्यसभा खासदार म्हणून कर्तव्यास पात्र ठरणार आहेत. त्यांची न्यायप्रणालीतील पात्रता आणि राष्ट्रीय प्रतिष्ठा लक्षात घेता त्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळू शकते. रावेर लोकसभा मतदारसंघातून प्रतिनिधीत्व करीत असलेल्या रक्षा खडसे सध्या मोदींच्या मंत्रिमंडळात केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री या पदावर कार्यरत आहेत. मात्र, आता राजकीय समीकरण बदलल्याची चर्चा आहे. ॲड. उज्वल निकम यांना मंत्रिपद दिल्यास त्यांच्या जागेवर रक्षा खडसे यांची माघार होण्याची शक्यता आहे. एकाच जिल्ह्याला दोन केंद्रीय मंत्री सहसा मिळत नसल्याने रक्षा खडसे यांना 'नारळ' देण्यात येईल अशी राजकीय वर्तुळात चर्चा जोर धरीत आहे. मंत्री गिरीश महाजन आणि खडसे परिवारामध्ये तंटा असल्याने निकमांना समर्थन देऊन महाजन राजकीय फायदा मिळवू शकतात.

### मोदींचा निकमांना प्राधान्य क्रम!

पंतप्रधान नद्र मोदी यांचा ॲड. उज्वल निकम यांना सुरुवातीपासूनच प्राधान्य क्रम राहिला आहे. सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ॲड. निकम यांना भाजपाने मुंबई उत्तर मध्य मतदारसंघातून उमेदवारी देवू केली होती. त्यावेळी मोदींनी जाहिर सभेत ॲड. निकम हे देशासाठी उत्कृष्ठ काम करतील असा विश्वास व्यक्त केला होता. निकमांचा त्यावेळी पराभव झाल्याने त्यांची संधी हुकली असली तरी त्यांना आता 'सुवर्णसंधी' चालून आलेली आहे. मंत्रिपद देण्याची विचार झाला तर ॲड. निकम यांच्याकडे कायद्यासंदर्भातील मंत्रिपद येवू शकते.

### खडसेंकडे येणार संघटनेचे काम?

ॲड. निकम यांना मंत्रिमंडळात स्थान दिले तर रक्षा खडसे यांचे पद धोक्यात येवू शकते. खडसेंचे राजकीय पुनर्वसन करण्याचे ठरल्यास त्यांच्याकडे पक्ष संघटनेची जबाबदारी देण्यात येईल. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका असून त्यावेळी हा बदल होण्याची दाट शक्यता आहे.

## सोने-चांदी

- **सोने** (प्रति १० ग्रॅम) : ९७,८९०
- **चांदी** (प्रति १ किलो): ११२,७९०

## तापमान

- **कमाल** : ३१ अंश सेल्सिअस
- **किमान** : २५ अंश सेल्सिअस

## महत्वाचे



### पुणे विद्यापीठात विद्यार्थ्यांचे आंदोलन

**पुणे :** पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठात इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी आक्रमक आंदोलन केले आहे. कॅरी ऑन परीक्षा घ्याव्यात या मागणीसाठी विद्यार्थी आक्रमक झाले होते.यावर दोन दिवसात निर्णय घेऊ असे विद्यापीठाने सांगितल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.२०१९ अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना कॅरी ऑनची विशेष संधी उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी 'कॅरी ऑन' आंदोलन पुकारण्यात आले होते. कॅरी ऑन परीक्षा संदर्भात सातत्याने पाठपुरावा करूनही पुणे विद्यापीठाकडून कोणतीही दखल न घेतल्यामुळे आक्रमक होत शेकडो विद्यार्थ्यांनी आज पुणे विद्यापीठामध्ये आंदोलनाचा पवित्रा घेतला होता. विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन घेऊन हे विद्यार्थी कुलगुरूंना भेटण्यासाठी विद्यापीठातील मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वारावर जमा झाले होते.मात्र त्यांना पोलीस कर्मचाऱ्यांकडून रोखण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भावना तीव्र झाल्या. त्यानंतर विद्यार्थ्यांनी गेट समोर जोरदार घोषणाबाजी करीत गेटवर चढून कुलगुरूंचे कार्यालय असलेल्या मुख्य इमारतीमध्ये प्रवेश केला.

# विजयी मेळावा केवळ मराठी पुरताच

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नाशिक** प्रतिनिधी



राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंशी युती करण्याबाबत मोठं विधान केलंय. मराठीचा विजयी मेळावा केवळ मराठी पुरताच, त्याचा राजकारणाशी संबंध नाहीये, विधान राज ठाकरेंनी केलंय. इगतपुरीतील अनौपचारिक गप्पांदरम्यान राज ठाकरेंनी हे विधान केलंय. राज ठाकरेंच्या विधानामुळे युती सस्पेन्स अजून कायम आहे. नाशिकमधील इगतपुरी येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तीन दिवशीय शिबीर मेळावा होत आहे. या मेळाव्यासाठी मनसे प्रमुख राज ठाकरे आले आहेत. यावेळी कार्यकर्त्यांशी बोलताना त्यांनी उद्धव ठाकरेंसोबत युतीबाबत हे विधान केलंय. ठाकरेंच्या शिवसेनेकडून युतीबाबत टाळी देण्यात आलीय. मात्र, मनसेकडून सावध पवित्रा घेण्यात येत आहे. मराठीचा विजयी मेळावा केवळ मराठी पुरताच, त्याचा राजकारणाशी संबंध नाही. नोव्हेंबर - डिसेंबर दरम्यान चित्र पाहूनच युतीचा निर्णय घेऊ, असं राज ठाकरे म्हणाले आहेत. महाराष्ट्रात सध्या मराठी एकजुटीचे जोरदार वारे वाहत आहे. मराठीच्या प्रश्नावर दोन ठाकरे एकत्र आले. पण युतीसंदर्भात मनसेच्या प्रवक्त्यांनी माध्यमांशी बोलू नये, असं आदेश राज ठाकरेंनी दिलेत. त्याचबरोबर बाळा नांदगावकर यांनीही त्याचपद्धतीचे विधान केलंय. याआधीही एकटे लढलो आहोत, आता पुढे वेळ आली तरी एकटे लढू असं विधान बाळा नांदगावकर यांनी केलंय. दरम्यान युती संदर्भात

पान २ वर »

# दोन उभ्या एक्सप्रेसच्या डब्यांना भीषण आग

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**तिरुपती** प्रतिनिधी



तिरुपतीमधून धक्कादायक बातमी समोर आली आहे. रेल्वे स्टेशन यार्डमध्ये उभ्या असलेल्या हिसार एक्स्प्रेस आणि रायलसीमा एक्सप्रेसच्या डब्यांना आग लागल्याचे समोर आले आहे. सध्या आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम सुरु आहे. या डब्याना आग लागल्यानंतर रेल्वे कर्मचाऱ्यांनी त्वरित उर्वरित डबे वेगळे केले, त्यामुळे मोठे नुकसान टळले आहे. या घटनेत कोणत्याही जीवितहानीचे वृत्त समोर आलेले नाही. राजस्थानहून आंध्र प्रदेशातील तिरुपतीला जाणाऱ्या हिसार एक्सप्रेसला आग लागल्यामुळे तिरुपती रेल्वे स्थानकाजवळ गोंधळ उडाला होता. आग लागलेल्या रेल्वेच्या डब्यांमध्ये धूर आणि आगीच्या ज्वाळा बाहेर निघत होत्या. त्यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर रेल्वे अधिकाऱ्यांनी तातडीने मदत आणि बचाव कार्य सुरू केले, त्यामुळे मोठी हानी टळली आहे. रेल्वेच्या डब्यांना आग लागल्यानंतर हिसार एक्सप्रेसजवळून जाणारी वंदे भारत ट्रेन थांबवण्यात आली, त्यामुळे मोठा अपघात टळला आहे. रेल्वे अधिकाऱ्यांच्या सतर्कतेमुळे शेकडो प्रवाशांचे प्राण वाचले आहेत. सध्या आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम सुरु आहे. तिरुपतीतील या अपघातामुळे रेल्वेच्या सुरक्षेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दोन दिवसातील ही दुसरी घटना आहे. रविवारी चेन्नई-अरक्कोनम रेल्वे मार्गावर एका कच्च्या तेलाच्या टँकर ट्रेनला आग लागली होती, त्यामुळे रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली होती. त्यानंतर आज डब्यांना आग लागल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. रेल्वेला ही आग का लागली याच्या कारणाचा शोध घेतला जाणार आहे.

# सावदा शहराचा अजून चार दिवस पाणीपुरवठा बंद

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**सावदा** प्रतिनिधी

सावदा शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनचे सावदा रेल्वे स्टेशन जवळ मोठ्या प्रमाणात लिकेज झाल्यामुळे सावदा शहरात होणारा पाणीपुरवठा चार ते पाच दिवस बंद राहण्याचे आवाहन नगरपालिका पाणीपुरवठा विभाग यांनी केले आहे. सविस्तर वृत्त असे की सावदा शहराला हातनुर धरण येथून पाणीपुरवठा केला जातो मात्र पाणीपुरवठ्याची पाईपलाईन ही रेल्वे लाईन क्रॉस करून आल्याने या ठिकाणी वेळोवेळी पाईपलाईन मोठ्या प्रमाणात लिकेज होत होती. त्यामुळे ती पाईपलाईन नवीन टाकून त्यापुढील असलेला लिकेज जोडणीचे काम अधिकारी नगर परिषदेचे मुख्याधिकारी भूषण वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली पाणीपुरवठा अधिकारी प्राजक्ता जैन, अविनाश पाटील यांनी युद्ध पातळीवर सुरू केलेले असल्याने सावदा शहराला होणारा पाणीपुरवठा हा ११ जुलै पासून पाच ते सहा दिवस बंद राहण्याचे दवंडीच्या माध्यमातून शहरात सांगण्यात आले होते. परंतु पाईपलाईन मोठ्या प्रमाणात लिकेज व काही पाईपलाईन नवीन टाकण्याचे काम सुरू असल्याने बंद राहणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या कालावधीमध्ये पुढील तीन ते चार दिवस वाढ करण्यात आलेली आहे. तरी नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा तसेच शहरातील रविवार

पान २ वर »

### महाराष्ट्रात धर्मांतर विरोधी कायदा येणार

**मुंबई :** महाराष्ट्रात अनेक ठिकाणी धर्मांतराच्या घटना घडत असल्याचा मुद्दा भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी विधान परिषदेत उपस्थित केला. यावर उपमुख्यमंत्री पंकज भोयर यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की, यासंदर्भात तपासासाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे. भोयर यांनी नमूद केले की, महाराष्ट्रात जबरदस्तीने धर्मांतराला परवानगी नाही. समितीने केलेल्या अभ्यासात सुमारे ३५ प्रकरणे समोर आली.


## भडगाव नगरपरिषद, भडगाव, जि. जळगाव

दूरध्वनी : 02596-213278,फॅक्स नं. 02596-213278,ई-मेल : npbhadgaon@gmail.com

क्रमांक : भ.न.प.875/2025 | दिनांक : 14/07/2025

### -: जाहीर सूचना:-

### मालमत्ता करावरील शास्ती (दंड) माफीसाठी अभय योजना नागरिकांसाठी जाहीर आवाहन

राज्यातील नगरपालिका / नगरपरिषद व नगरपंचायती क्षेत्रामध्ये अनेक वेळा मालमत्ता कराची थकबाकीची रक्कम जास्ती असणे, मालमता धारक यांची आर्थिक अडचण असणे व इतर कारणांमुळे मालमत्ता कराचा भरणा करण्यात येत नाही. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 150 (अ) (1) नुसार बिलाच्या न भरलेल्या रकमेवर दरमहा 2% शास्ती (दंड) लावण्याचे प्रावधान आहे. यामुळे मालमता धारक यांच्या एकूण थकबाकी मध्ये वाढ होऊन याचे विपरीत परिणाम कर वसुलीवर होता. यावर उपाययोजना म्हणून नगरपरिषद क्षेत्रातील थकीत मालमत्ता करा वरील शास्ती माफ करून कर वसुली करण्यासाठी प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीने अभय योजना लागू करण्याबाबत शासन स्तरावर विचार करण्यात आलेला आहे.

त्यानुसार नगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायत क्षेत्रामधील मालमता धारकांकरिता महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. एमयुएम-2025/प्र.क्र.70/नवी 17, दिनांक 19/5/2025 रोजी मालमत्ता करा वरील शास्ती (दंड) माफ करणे कामी अभय योजना प्रोत्साहनात्मक राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सदर योजनेमध्ये ज्या थकीत मिळकत धारकांची थकबाकी आहे. अशा मिळकत धारकांनी मालमत्ता करावरील शास्ती (दंड) अंशत: किंवा पूर्णत: माफ करण्यासाठी मिळकत कराची पूर्ण रक्कम भरुन विहित नमुन्यात अर्ज सादर करू शकतील.

1) अभय योजना एकदाच लागू आहे.
2) थकीत मालमत्ता कराच्या रकमेवरील फक्त शास्तीस (दंड) अभय योजना लागू आहे.
3) अभययोजना थकीत मालमता कर वसुलीसाठी प्रोत्साहन पर आहे.
4) जे मिळकत धारक शास्ती (दंड) वगळता इतर थकीत मालमता कराची संपूर्ण रक्कम भरतील त्यांच्या बाबतीतच शास्तीच्या (दंड) सवलतीचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवण्यात येईल.
5) सदर योजनेच्या लाभ देणे काम नगर परिषदेकडे मिळकत धारकांनी प्रस्ताव / विहित नमुन्यात अर्ज देणे आवश्यक आहे.
6) जे मिळकत धारक अभय योजनेच्या लाभ घेऊ इच्छिता आशांकडून विहित नमुन्यात प्रकरण 50 टक्के किंवा त्याहून जास्त सवलत मागणी करिता परिपूर्ण प्रस्ताव नगर परिषदेकडे सादर करावा लागेल विहित नमुना नगरपरिषदेच्या कार्यालयात उपलब्ध असून, त्या नमुन्यात अर्ज सादर करावा.
7) दिनांक 19/05/2025 नंतरच्या थकबाकी शास्तीस (दंड) अभय योजना लागू राहणार नाही.
8) प्रस्ताव सादर करताना आधार कार्ड छायांकित प्रत मालमत्ता कराची मागणी बिल छायांकित प्रत संपूर्ण कर कराची रक्कम भरलेल्या पावतीची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
9) सदर प्रस्ताव / विहित नमुन्यातील अर्ज दि. 25/06/2025 पासून ते दि. 31/07/2025 पर्यंत नगरपरिषद कार्यालयात सादर करावा. तरी थकीत शास्ती (दंड) वगळता कराची इतर रक्कम तात्काळ भरुन शास्ती (दंड) माफी अभय योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येते आहे.

सही /-
(रविंद्र शिवाजी लांडे)
मुख्याधिकारी
भडगाव नगरपरिषद, भडगाव


# राष्ट्रपतींच्या विवेकाधीन अनुदानातून विद्यार्थ्यांना निधी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** प्रतिनिधी



आदिवासी कार्य मंत्रालयाच्या अखत्यारीतील येणाऱ्या राष्ट्रीय आदिवासी विद्यार्थी शिक्षण संस्थेच्यामार्फत, राष्ट्रपतींच्या विवेकाधीन अनुदानातून ६२.४० लाखांच्या निधीचे आज वितरण करण्यात आले आहे. ही आर्थिक मदत देशभरातील एकलव्य मॉडेल निवासी शाळांमधील (ईएमआरएस ) बारावीतील ८३२ गुणवंत विद्यार्थ्यांना देण्यात आली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल जागरुकता निर्माण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रपतींच्या संमतीने ही विशेष मदत मंजूर करण्यात आली होती, ती आता वितरितही

पान २ वर »

## एक लाख विस हजारांचा मुद्देमाल नष्ट

# हातभट्टी गावठी दारूवर धाडसत्र

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पारोळा** प्रतिनिधी



पारोळा तालुक्यातील पिंपरी प्र. उ. व टोळी शिवारात दोन वेगवेगळ्या गावठी दारूच्या हातभट्टींवर छापा टाकून गावठी हातभट्टी दारू व हातभट्टी गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे कच्चे रसायन असा एक लाख विस हजार पाचशे रुपयांचा मुद्देमाल आरोपींच्या ताब्यातून जप्त करून जागीच नष्ट करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, पारोळा तालुक्यातील पिंपरी प्र उ व टोळी शिवारात पारोळा पोलिसांच्या वतीने हातभट्टी गावठी दारू चे अड्डे नष्ट करण्यात आले . सदर कारवाईत आरोपीतांवर मुंबई दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हे

पान २ वर »

# मुंबई विमानतळावर ट्रकची विमानाला धडक

## टेकऑफपूर्वी दिली धडक : विमानाचे उड्डाण रद्द करत पर्यायी विमानाची व्यवस्था

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी





गेल्या काही दिवसांपासून विमान अपघाताच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. आज मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर एक मोठा अपघात टळला आहे. टेकऑफपूर्वी एका मालवाहू मालवाहू ट्रकने अकासा एअरलाइन्सच्या क्यूपी १४१० या विमानाला धडक दिली. हे विमान मुंबईवरुन दिल्लीला जाणार होते. या अपघातात विमानासह आणि ट्रकचेही नुकसान झाले आहे. या अपघातानंतर या विमानाचे उड्डाण रद्द करण्यात आले व प्रवासांसाठी पर्यायी विमानाची व्यवस्था करण्यात आली. समोर आलेल्या माहितीनुसार ही घटना पहाटे ४.५४ वाजता घडली. अकासा एअरलाइन्सचे विमान बेंगळुरूवरून मुंबईला आले होते, ते बे ए-७ वर पार्क केले होते. काही वेळानंतर हे विमान मुंबईहून दिल्लीला जाणार होते. या विमानातून माल उतरवला जात होता, त्यावेळी बर्ड वर्ल्डवाइड फ्लाइट सर्व्हिसेसचा एक ट्रक विमानाच्या उजव्या पंखावर आदळला, यामुळे विमानसह ट्रकचेही नुकसान झाले आहे. विमानतळावर झालेल्या या धडकेनंतर, त्याची तपासणी करण्यात आली, यात हे विमान उड्डाणासाठी अयोग्य असल्याचे आढळले. या विमानाला तांत्रिकदृष्ट्या एअरक्राफ्ट ऑन ग्राउंड (एओजी) घोषित करण्यात आले. यानंतर अकासा एअरलाइन्सने उड्डाणासाठी व्हीटी व्हीबीवी नवीन विमान उपलब्ध करून दिले. यात बसून प्रवासी दिल्लीला गेले. या घटनेनंतर अकासा एअरलाईन्सने याबाबत माहिती दिली आहे. यात कंपनीने म्हटले की, सध्या सर्वकाही ठीक असून कोणालाही इजा झालेली नाही. मात्र या अपघातामुळे प्रवाशांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. या प्रकरणाची सविस्तर चौकशी सुरू आहे. चौकशीनंतर दोषींवर कारवाई होण्याची शक्यता आहे. तसेच यापुढे अशा घटना टाळण्यासाठी कठोर पावले उचलली जाण्याची गरज आहे. दरम्यान, अहमदाबादमध्ये गेल्या महिन्यात एअर इंडियाचे विमान कोसळले होते. या घटनेत २४१ विमान प्रवाशांसह २७० पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला होता. हे विमान अहमदाबादवरून लंडनला जात होते. या अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचाही मृत्यू झाला होता. उड्डाणानंतर अवघ्या काही सेकंदांमध्ये हे विमान कोसळले होते. या घटनेमुळे संपूर्ण देश हळहळला होता.

जळगांव 0257 - 2237491, 9422775011, 8999256713 | ठाणे -मुंबई - 9422284511 | नाशिक-9890525925 | पुणे - 9209832828 | lokshahilive@gmail.com, lokshahi@hotmail.com

पान ५ वरून

## राजुरी बुद्रुकच्या सरपंचपदी...

(उबाठा) शशिकांत पाटील, अनंतराव पाटील, संजय पाटील, बाळू पाटील, रामभाऊ पाटील, मुरलीधर पाटील, शांताराम उभाळे, भगवान पाटील, योगेश (पिंटू) पाटील, अफसर तडवी, धनंजय पाटील, श्रीकांत पाटील, सुरेश पाटील, विजय पाटील, घनश्याम कोळी, प्रल्हाद पाटील, प्रवीण पाटील, पोलीस पाटील नंदकिशोर पाटील व ग्रामपंचायत उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक आदी मान्यवर उपस्थित होते.

## लोकवर्गणीसह शिक्षणकर...

संकेत दिले, अनंत निकम यांनी ठेका दिलेल्या खाजगी संस्थेस डीनाईड करून शिक्षण कर कमी करा अशी मागणी करत इतर मुद्दे उपस्थित केले. अनिल कासार यांनी हायकोर्टाच्या निकालानुसार सर्वांचिंच लोकवर्गणी माफ करा अशी मागणी केली. चेतन राजपूत यांनी नव्या मालमत्ता धारकांना नोटीस मग संबंधित संस्थेने जुन्या मालमत्ताची मोजणी का केली असा प्रश्न उपस्थित केला. पाणीपट्टीवर आकारली जाणारी २ टक्के शास्ती, वाढीव मालमत्ता कर रद्द करणे यासारखे अनेक मुद्दे उपस्थित करत न्याय देण्याची मागणी केली. यानंतर मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले. सदर बैठकीत उत्तर देताना मुख्याधिकारी तुषार नेरकर म्हणाले की शहरात २३ हजार मालमत्ता धारक आहे, आता जे कराच्या कक्षेत नाहीत अशा ४१८७ मालमत्ता धारकानाच नोटीस दिली असून यात कोणतीही दुकान भाडे अथवा करवाढ नाही. सर्व जुन्या बॉडीच्या ठरावानुसारच कर लावले आहेत. आपली हरकत आल्यावर संबंधित विभाग योग्य तो निर्णय घेईल मालमत्ता हस्तांतरण २ टक्के कर जास्त वाटत असला तरी हा देखील जुन्या बॉडीचा ठराव असून यासंदर्भात देखील कायदेशीर बाबी तपासून कमी करण्याचा प्रयत्न करू, न प शिक्षण कर कमी करण्यासाठी देखील कायदेशीर बाबी तपासून निर्णय घेऊ, पार्किंग, कच्चे शेड किंवा अपूर्ण बांधकाम बाबत कर लावला असल्यास हरकती घ्याव्यात. तसेच पाणीपट्टी वर २ टक्के शास्ती व लोकवर्गणी बाबत सर्व जुने ठराव तपासून त्याबाबत निर्णय घेऊ आणि निवडणूकि नंतर येणाऱ्या कौन्सिल च्या पहिल्याच सभेत काही अन्यायकारक ठराव रद्द करण्याचा प्रयत्न करू अशी ग्वाही त्यांनी देत अनेक प्रश्नांवर समर्पक उत्तरे दिलीत.

## रावेर तालुक्यातील...

जळगाव जिल्ह्यातील तसेच मध्यप्रदेशच्या सीमेवर असलेल्या रावेर तालुक्यातील या तरुणाने आपल्या गावठी मराठी आणि खान्देशी बोली भाषेच्या माध्यमातून अभिनयाला अत्यंत नैसर्गिक रंग दिला आहे. इंस्टाग्राम आणि मिनी व्लोगच्या माध्यमातून तुषार आपल्या दैनंदिन दिनचर्येतील जीवनातील छोट्या-छोट्या प्रसंगांना नवे रूप देऊन लाखो तरुणांच्या मनावर अधिराज्य करत आहे. यामुळे पुनखेडा या छोट्याशा गावाला जिल्हाभर आणि सीमावर्ती क्षेत्रात एक वेगळे ओळख मिळाली आहे. लोकांकडून मिळणाऱ्या प्रतिसादातून स्पष्ट होत आहे की, तुषार कोळी हा कलाकार स्थानिक भाषा आणि संस्कृतीची जोपासना करत असताना आपल्या कलाकृतींनी लाखो लोकांचे मन जिंकण्यासाठी पुढे आला आहे. इंस्टाग्रामवर २० हजारांहून अधिक फॉलोअर्स मिळवणारा हा कलाकार केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नाही तर राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींपासून ही त्याला अनेकदा कौतुकाची थाप मिळाली आहे. तुषार कोळीच्या अभिनयाने खान्देश आणि मध्यप्रदेश भागातील युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. त्याच्या कला आणि बोलल्या जाणाऱ्या बोली भाषेमुळे तो जवळच्या गावांमध्ये ही उल्लेखनीय नाव कमावत आहे. सोशल मीडियावर खात्रीशीर आणि स्थानिक संस्कृतीशी जोडलेले सादरीकरण करणारा तुषार कोळी हा पुनखेडा गावाचा अभिमान ठरला आहे. जळगाव जिल्हा व आसपासच्या भागांमध्ये त्याचा प्रभाव वाढत चालला असून, त्याच्या कार्यामुळे स्थानिक कलात्मकतेला नवे आयाम मिळाले आहेत. तुषार कोळीचा सोशल मिडिया वरील प्रवास अनेक तरुणांसाठी प्रेरणा आहे की, आपल्या मातृभाषा आणि संस्कृतीला जपत उत्कृष्टता साध्य करता येते. रावेर तालुक्यातील पुनखेडा येथील तुषार कोळी हे स्थानिक बोलीभाषेतील कलावंत म्हणून सोशल मीडियावर नवे इतिहास रचत आहेत. त्यांच्या कलेमुळे खऱ्या अर्थाने या क्षेत्राची ओळख वाढत आहे आणि लाखो तरुण त्यांच्या कामाचा आदर करत आहेत. सोशल मीडियावर मराठी कलाकारांच्या वाढत्या संख्येत तुषारला यशस्वी भवितव्याची खात्री आहे.

## 'क्षितिज हा' उपक्रमात...

मधील मैत्री, सोशल मीडियाचा वापर करतांना घ्यावयाची काळजी, आई-वडिलांच्या मनात आपल्याबद्दलचा आत्मविश्वास कसा जागृत ठेवावा, त्यांच्या आत्मविश्वास कसे पात्र व्हावे, शरीर आणि मनात होणारे बदल मित्रपरिवार इतर नातेवाईक, मोबाईल व सोशलमीडियाचा वापर आपली आवड, क्षमता ओळखून आपल्या करिअरच्या वाटा निवडण्यासाठीचे प्रयत्न, अभ्यास कसा करावा, शिक्षणाविषयी जागरूकता अशा एक ना अनेक विषयावर नाटिका स्वरूपात विद्यार्थ्यांसमोर समुपदेशक मॅम यांनी उत्कृष्ट असे सादरीकरण केले. समुपदेशक प्रज्ञाताई देशमुख, वैशालीअवलगावकर, उज्वला निकाळजे, अर्चना धोबे, रागिनी कोठेकर यांनी सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन पी. जी. पाटील यांनी केले आभार पर्यवेक्षक व्ही. एम शिरपुरे यांनी मानले याप्रसंगी पर्यवेक्षक विनोद पाटील व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## पंचायत समितीकडून...

अंतर्गत येणाऱ्या घरकुल, शिक्षण, सिंचन, पशुवैद्यकीय, आरोग्य, रोजगार हमी, बांधकाम, कृषि, महिला व बालविकास यांसह अन्य विभागांचा या बैठकीत आढावा घेण्यात आला. पारोळा पंचायत समितीत ही गेल्या वेळीचा कारवायांनी चांगलीच गाजली आहे. अनेक अधिकारी, जास्त करून घरकुल विभाग गोर-गरिब, सर्वसामान्य नागरिकांकडुन पैशांची मागणी करतात, तसेच दैनंदिन कामकाजासाठी पंचायत समितीत येणाऱ्या नागरिकांची फिरवा फिरव केली जाते. शेतकऱ्यांसाठी असलेल्या पाणंद रस्ते योजनेचं मष्टर बंद आहेत, त्यामुळे रस्त्यांची कामे रखडलेली आहेत. पाणंद रस्त्यांबाबत मोठ्या तक्रारी आहेत, यापुढे या तक्रारी पुर्णपणे बंद झाल्या पाहिजेत. तसेच पैशांची मागणी यापुढे कोणत्याही कर्मचाऱ्याने केली तर त्यावर कडक कारवाई केली जाईल असे यावेळी आ अमोल पाटील यांनी सांगितले. नागरिकांचा समस्येचे निराकरण होणेस विलंब का होतो? पगार असतांना देखील गोर-गरिब, सर्वसामान्य नागरिकांकडुन पैशांची मागणी का केली जाते ? असे प्रश्न आ. अमोल पाटील यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना विचारले. यापुढे एकही तक्रार अथवा पैशांचा मागणीचे प्रकरण समोर आल्यास जो कुणी असेल त्याची गय केली जाणार नसल्याचे आ. अमोल पाटील यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना सांगितले. याप्रसंगी ग्रामीण भागातील अनेक ग्रामस्थ तसेच पंचायत समितीचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिंपळगाव पोलीसांचा...

माहिती देण्यात आली. तसेच पोक्सो कायद्यांतर्गत मुलींना माहिती असावी. याचेही ज्ञान पोलिसांनी मुलींना दिले. त्यामुळे मुलींच्या मनामध्ये जनजागृती दिसून आली. एकटे कुठे फिरू नये. कोणाच्या मोटरसायकलवर एकटे बसू नयेस. रात्रीच्या वेळेला किंवा संध्याकाळच्या वेळेला आई-वडील, भाऊ असेल तरच बाहेर पडावे. अशा सूचना पोलिसांनी दिल्या आहेत. यावेळी पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव क्षीरसागर, महिला पोलीस योगिता चौधरी, मनीषा खंडारे, गायत्री पाटील आदींनी मार्गदर्शन केले.

## वैद्यकीय अधिकारी...

सुद्धा कुटुंब नियोजन पद्धतीचा अवलंब करण्यावर लाभार्थींना मार्गदर्शन करण्यात येत असते. तालुक्यात २०२४-२०२५ मध्ये ८८ महिलांना प्रसूतीच्या वेळी कॉपर टी बसविण्यात आली, तर ३५५ महिलांना पाळणा लांबवण्यासाठी कॉपर टी बसविण्यात आली, १३० महिलांना इंजेक्शन देण्यात आले. तर १०७६ महिलांना गर्भनिरोधक गोळ्या व २०४८ पुरुषांना कंडोम वाटप करून आरोग्य विभामार्फत कुटुंब नियोजन करण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर, माता बालसंगोपन अधिकारी डॉ. रमेश धापते व जामनेर तालुक्याचे नियमित सर्जन डॉ. समाधान वाघ, सर्व वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय जामनेर, वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय पहूर, आरोग्य कर्मचारी, गटप्रवर्तक, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका यांच्यामुळेच हे कामकाज पूर्ण झाले म्हणून तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश सोनवणे वरील सर्वांचे आभार मानले पुढेही असेच कामकाज करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## समाजाच्या विकासासाठी...

सचिव पदी राजेश सावळे, कार्याध्यक्षपदी योगेश अमोदकर व गोकुळ साळुंखे उपाध्यक्ष यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी अखिल भारतीय जीवा सेना जिल्हा संघटक योगेश बोरनारे, धनराज बोरणारे, हेमंत चांदवे, राजेश बोरनारे, किशोर बोरनारे, महेंद्र सापकर, अनिल मानकरी, विश्वास कुवर, उमेश निंबाळकर, महेंद्र बोरनारे, काशिनाथ आटवाडेकर, नामदेव निंबाळकर, चिंतामण आमोदे, शांताराम निंबाळकर, प्रभाकर मानकरे, दिनेश जैनकार, किरण बोरसे, पुंजाजी तांदूळकर, राज निंबाळकर, चेतन जैनकार यांच्यासह नाभिक समाज बांधव उपस्थित होते. सूत्रसंचालन धनराज बोनारे तर आभार उमेश निंबाळकर यांनी मानले.

## पर्यावरण संतुलनासाठी...

कार्यक्रम बाबत माहिती दिली. हा कार्यक्रम दिनांक १५ जून ते ३० सप्टेंबर २०२५ या दरम्यान राबविण्यात येणार आहे. ''अमृत वृक्ष- आपल्या घरी'' ही योजना शासकीय, निम शासकीय, शाळा, महाविद्यालय यांच्याकरिता मागणीनुसार व उपलब्धतेनुसार मोफत रोपे पुरवठा करण्यात येणार आहे अशी माहिती त्यांनी दिली. तसेच वेगवेगळ्या झाडांची ओळख करून दिली. त्यांचे वन औषधी उपयोग सांगितले. सदर कार्यक्रमासाठी डॉ. एच. जी. भंगाळे, डॉ. आर. डी. पवार, प्रा. संजीव कदम, सामाजिक वनीकरण विभाग यावल येथील वनपाल- आर. एम. तडवी, वनरक्षक चंद्रकांत सूर्यवंशी वनरक्षक ज्ञानोबा धुळगुंडे वन कर्मचारी दत्तात्रय तळेले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन उपप्राचार्य प्रा. एम. डी. खैरनार यांनी केले तर आभार प्रा. मनोज पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. नरेंद्र पाटील प्रा. छात्रसिंग वसावे, डॉ. वैशाली कोष्टी, प्रा. इमरान इरीस प्रा. सोनाली पाटील, प्रा. प्रतिभा रावते, प्रा. रूपाली शिरसाट, प्रा. हेमंत पाटील, मिलिंद बोरघडे शिक्षक व शिक्षिकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून

## विजयी मेळावा...

कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम नको ,असं सामना या मूखपत्रातून सांगण्यात आलंय. मराठीच्या प्रश्नावर दोन ठाकरे एकत्र आले. ते राजकीयदृष्ट्याही यावेत हा मराठी माणसांचा रेटा अभूतपूर्व आहे. दिल्ली,महाराष्ट्राचे सत्ताधारी युती घडू नये म्हणून प्रयत्न करतील. ठाकरेंच्या युतीची सर्वाधिक भीती एकनाथ शिंदेंना आहे, असंही सामनामध्ये म्हटलंय. आता संभ्रम नको, असं आवाहन रोखठोकद्वारे करण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांआधी मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी मनसेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना शिवसेना ठाकरे आणि मनसेच्या युतीवर भाष्य करू नये, असे आदेश दिलेत. राज ठाकरेंच्या या आदेशामुळे मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या युतीबाबत संभ्रम निर्माण झालाय. आता राज ठाकरेंनी इगतपुरीमध्ये कार्यकर्त्यांशी बोलताना विजयी मेळावा केवळ मराठी पुरताच, त्याचा राजकारणाशी संबंध नाही. युतीचा निर्णय नंतर घेऊ असं राज ठाकरे म्हणालेत.

## सावदा शहराचा अजून...

पेठ, गांधी चौक, थोरगव्हाण रस्ता येथील गावहळा त्याचप्रमाणे नगरपालिका मालकीच्या कुपनलिका द्वारे शहरात पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. असे पाणीपुरवठा अधिकारी प्राजक्ता जैन यांनी सांगितले आहे.

## राष्ट्रपतींच्या विवेकाधीन...

कण्यात आली आहे.या आर्थिक मदतीसाठी ईएमआरएस शाळेतील बारावीच्या विज्ञान, वाणिज्य व कला शाखेतील दोन गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ७५०० रुपये इतकी रक्कम अनुदान स्वरूपात देण्यात आली आहे. संबंधित विद्यार्थ्यांची निवड त्यांच्या शैक्षणिक कामगिरीच्या आधारावर करण्यात आली होता. अनुदानाची रक्कम विद्यार्थ्यांच्या किंवा त्यांच्या पालकांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. यातून या अनुदान वितरणातील पारदर्शकतेची खात्री मिळते. १० ईएमआरएस शाळांमधील २० विद्यार्थ्यांचे गुण समान होते, त्यामुळे टाय-ब्रेकर निकष लागू करण्यात आले होते. अशा ठिकाणी मुलींना प्राधान्य देण्यात आले आहे, मात्र अशा तरीही गुण टाय झाले होते, त्यामुळे इयत्ता अकरावीतील गुण विचारात घेण्यात आले आणि त्यानंतर लाभार्थी विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. आदिवारी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणारा हा उपक्रम भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि एनईएसटीएस यांची दूरदृष्टी अधोरेखित करतो. या उपक्रमाचा उद्देश गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्रोत्साहन देणे, आदिवासी तरुणांना उच्च शिक्षण व व्यावसायिक संधी मिळण्यासाठी मार्गदर्शन करणे हा आहे.

## हातभट्टी गावठी...

नोंद करण्यात आले आहेत. अरोपी आबा पोपट भिल, वय ५४वर्ष, रा. पिंप्री पारोळा यांच्या वर कायदेशीर कारवाई करण्यात आली असल्याची माहिती पारोळा पोलीसांच्या वतीने देण्यात आली.

---

ॲड. एस. एस. पाटील

**जाहीर नोटीस**

**जामनेर येथील सह दि. न्या. क. स्तर**
**(वाय एस. आखरे), जामनेर, जि. जळगाव**
**दि.कि. अर्ज.नं.१३९/२०२५ नि.०७**

**अर्जदार – १) ज्योती नितेश देशमुख, उ.व. ३३, धंदा–घरकाम, २) प्रियल नितेश देशमुख, उ.व.१०, धदा–शिक्षण ३) पार्थ नितेश देशमुख, उ.व.१२, धंदा–शिक्षण, अर्जदार नं. १ स्वतः करीता व अर्जदार नं. २ व ३ ची अ.पा.क. आई ४) मिराबाई भगवान देशमुख, उ.व.६२, धंदा–घरकाम, रा.पहुर पेठ, ता. जामनेर, जि. जळगाव** // विरुध्द //.... सामनेवाला....कोणीही नाही.... अर्ज – बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट कलम २ व ३ प्रमाणे कायदेशीर वारस ठरवून मिळणेकरीता अर्ज .... १) अर्जदार हे वर नमुद पत्यावरील कायमचे रहिवासी असून आजही ते वर नमुद पत्यावर राहतात. तसेच अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा मयत नितेश भगवान देशमुख यांचे वारस आहेत असा वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. २) अर्जदार नं. १ ही मयत नितेश भगवान देशमुख यांची पत्नी असुन अर्जदार नं. २ व ३ हे मुले व मुली आहेत तर अर्जदार नं. ४ ही मयत नितेश भगवान देशमुख यांची आई आहे. या अर्जदारांशिवाय मयत नितेश भगवान देशमुख यांना दसरे कुणीही वारस नाहीत. मयत नितेश भगवान देशमुख हे मौजे पहरपेठ, ता. जामनेर, जि. जळगाव येथे राहत होते ते दि.०६/०५/२०२५ रोजी ३) याच गावी मयत झालेले आहे. ४) मयत नितेश भगवान देशमुख यांचे अर्जदार हे वारस असल्याबाबतचा वारस दाखला शासकिय व निमशासकिय कामी आवश्यक असल्याने तसा वारस दाखला ता. ०१/०७/२०२५ रोजी महसुल अधिकारी यांचेकडे मागणी केली असता त्यांनी सदरील वारस दाखला तुम्हास मे. न्यायालयाकडून काढावा लागेल, असे सांगितले. म्हणून अर्जदार हे मयत नितेश भगवान देशमुख यांचे कायदेशिर वारस असल्याचे ठरवून मिळण्यासाठी अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज मे कोर्टात दाखल करणे भाग झाले आहे. त्याअर्थी सदरील किरकोळ अर्जाचे कामी अर्जदार हे मयत नितेश भगवान देशमुख यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरिक्त मयत नितेश भगवान देशमुख यांना आणखी कोणी कायदेशीर वारस असल्यास योग्य तो पुरावा म्हणून दस्तऐवज व आपले लेखी म्हणणे देणेकामी स्वतः किंवा आपले वकीलांमार्फत मे. कोर्टात दि. १९/०८/२०२५ रोजी प्रत्यक्ष जाब देणेकामी व दस्तऐवज दाखल करणेकामी स्वतः हजर रहावे. जर अर्जदार यांचे व्यतिरिक्त कोणीही वारस नाही, असे समजून आल्यास मे. कोर्ट पुढील आदेश करतील. या कामी आपण हजर न राहील्यास आपले काही एक म्हणणे नाही असे समजण्यात येवुन आपला बचाव रद्द होणेस प्राप्त होईल.

**आज दिनांक ०७ जूलै २०२५ रोजी माझ्या सहीने व मे. न्यायालयाचे शिक्यानिशी जाहीर नोटीस दिली असे.**

हुकूमावरुन,
सही /–
क. लिपीक
सही /–
सहा. अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, जामनेर

---

**जाहिर नोटिस**

कै. बाळू प्रभाकर माळी यांचा दि.०६/०४/२०२५ रोजी वरणगांव येथे मृत्यु झाला असुन त्यांना कायदेशिर वारस म्हणुन मुलगा-१/मुली-२/पत्नी-१ असे वारस आहेत.

| अ.क्र. | वारसदारांचे नाव | वय | नाते |
|---|---|---|---|
| १. | संगीता बाळू माळी | ४९ | पत्नी |
| २. | श्री. परेश बाळू माळी | २५ | मुलगा |
| ३. | पल्लवी किशोर माळी | ३१ | मुलगी |
| ४. | हर्षाली चेतन महाजन | २९ | मुलगी |

येणे प्रमाणे त्यांच्या पश्चात कायदेशिर वारस आहेत. सदरच्या वारसांव्यतिरीक्त दुसरे इतर वारस नाहीत. कै. बाळू प्रभाकर माळी यांच्या नावे मौजे वरणगांव ता. भुसावळ येथील नगर परिषद मालमत्ता क्र. नविन नं. ३/७८२ व जुना नं. ६१८६ असा आहे. मिळकतीस वरील प्रमाणे वारस नगर परिषद वरणगाव दप्तरी येथे नोंद होणेबाबत नोटीस व्दारे प्रसिध्दी देण्यात आली आहे. या वारस नोंद होणे बाबत कोणाचीही काहीएक हरकत तक्रार असल्यास म. मुख्याधिकारी नगर परिषद वरणगाव यांचे दप्तरी लेखी स्वरूपात कळवावे.

---

प्रोसेस नाही **जाहीर नोटीस** ॲड.संजीव जी.नैनाव

**पाचोरा जि. जळगांव येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दि.कि.अर्ज नं.२५८/२०२५**
**निशाणी ०७**
**चौकशी तारीख - १३/०८/२०२५**

**अर्जदार:-**[१]श्रीमती ज्योती अनिल गुजर, वय ४६ धंदा घरकाम [२] नेहा अनिल पाटील वय २७ धंदा घरकाम [३] हेमंत अ निल गुजर वय २० धंदा शिक्षण रा. १ ते ४ गाडगेबाबा नगर,पाचोरा त. पाचोरा जि. जळगाव

**//विरुध्द//**

कोणीही नाही ... **सामनेवाला**

जाहीर नोटीस देण्यात येते की, अर्जदारनं. १ चे पती व २ ते ३ यांचे **वडील नामे कै.अनिल जगन गुजर हे दिनांक २५/१२/२०२१** रोजी मौजे शेंदुर्णी ता. जामनेर जि. जळगांव येथे मयत झालेले आहेत. अर्जदार नं. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार नं. २ व ३ हे मयताचे मुले व मुली आहेत. मयताची आई पुर्वीच मयत झालेली आहे. त्यामुळे **कै.अनिल जगन गुजर** यांना अर्जदारांव्यतीरिक्त अन्य कुणीही कायदेशीर वारस नाहीत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात भारतीय वारसा कायदा १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. मयत **कै.अनिल जगन गुजर** यांच्या नावे जे.डी.सी.सी.बॅक शाखा नांद्रा येथे **मयताचे नावे रक्कम रु. १३,९४,६७२.६०/- हि रक्कम खात्यात जमा असुन मयताचे बचत खाते क्र. ८१२०३२२०२७२८ असा** असुन सदरची रक्कम सदर जे. डभ.सी.सी.बॅक शाखा नांद्रा या खात्यात जमा आहे. सदरची रक्कम मयत **कै.अनिल जगन गुजर** यांचे वारसांना व्याजासह मिळणेकरीता अर्जदारांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. पाचोरा जि. जळगांव येथील मे. दिवाणी न्यायालयाने सदरील अर्जाचे **सुनावणीसाठी दिनांक १३/०८/२०२५ रोजीचा दिवस** निश्चित केलेला आहे. तरी **कै.अनिल जगन गुजर** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत. यांना वर नमुद वारस म्हणून समाविष्ट करणेसाठी तसेच वारस म्हणून यांचे वारस दाखल्याबाबत कोणाचा हितसंबंध किंवा अजून कोणी वारस असल्यास अगर सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर त्यांनी स्वत: किंवा आपल्या **वकिलांमार्फत दिनांक १३/०८/२०२५ रोजी सकाळी ११.००** वाजता या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखविल्या नाही तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस म्हणून समाविष्ट करण्यासाठी वारस म्हणूनचे सटफिकेट देण्यात येईल. **आज दिनांक १४/०७/२०२५ रोजी** माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

सही/- हुकूमावरुन
कनिष्ठ लिपीक सही/-
सहा.अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालया, पाचोरा

---

**जाहीर नोटीस** ॲड.व्ही.डी.महाजन

**पारोळा येथील दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर, पारोळा.जि. जळगाव यांचे न्यायालयात**

**दि.कि.अर्ज नं.१५२/२०२५**
**निशाणी ०७**
**पुढील चौकशी तारीख - २१/०८/२०२५**

**अर्जदार:-**[१]मंडाबाई पांडुरंग चौधरी उ.व. ७९,कामधंदा घरकाम [२] आनंदा पांडुरंग चौधरी उ. व. ४२ कामधंदा मजुरी [३] सुनिता भिकन चौधरी उ. व. ५० कामधंदा घरकाम, १ ते ३ रा. शेवळी गल्ली, पारोळा ता. पारोळा जि. जळगाव [४]रेखा विलास चौधरी, उ. व. ४७ कामधंदा घरकाम रा. पिंप्री खु. ता. धरणगांव जि. जळगाव [५] ज्योती आनंद चौधरी उ. व. ४० कामधंदा घरकाम रा. गुढे ता. भडगांव जि. जळगांव [६] देविदास पांडुरंग चौधरी [मयत] [६अ] अनिता देविदास चौधरी उ. व. ३२ कामधंदा घरकाम [६ब] राजश्री देविदास चौधरी, उ.व.१५ कामधंदा शिक्षण [६क] पुजा देविदास चौधरी उ.व.१२ कामधंदा शिक्षण, ६अ ते ६क रा. शेवळी गल्ली ता. पारोळा जि. जळगाव

**//विरुध्द//**

कोणीही नाही ... **सामनेवाला**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII चे कलम २ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी अर्ज**

ज्याअर्थी **मयत पांडुरंग खंडु चौधरी हे दिनांक ०६/०८/२०२४** रोजी मौजे पारोळा ता.पारोळा जि.जळगाव येथे मयत झालेले असुन ते मौजे पारोळा ता. पारोळा जि. जळगाव येथील रहिवासी होते. तसेच **मयत पांडुरंग खंडू चौधरी यांची आई मयत बायजाबाई खंडू चौधरी हे देखील मयत** झाले आहे.तसेच **मयत पांडुरंग खंडू चौधरी** यांचा मुलगा **मयत देविदास पांडुरंग चौधरी हे दि. १६/०५/२०२१ रोजी मयत** झाले आहे.**मयत पांडुरंग खंडू चौधरी** यांचे मृत्युनंतर त्यांचे नावे असलेल्या मौजे वंजारी खु. ता. पारोळा जि. जळगाव शिवारातील **शेत मिळकत गट नं.१०९/४/१/अ क्षेत्र ०० हे. ३० आर तसेच मौजे पारोळा, नगर भुमापन हद्दीत नगर भुमापन क्र.५३५ ही घर मिळकत असुन** सदर शेत मिळकत व घर मिळकत वर अर्जदार यांना वारस लावणेकामी तसेच इतर शासकीय व निमशासकीय कामांकरिता त्यांचे कायदेशिर वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळणेकामी अर्जदार यांना मयताचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी पारोळा येथील म. दिवाणी न्यायाधिश क. स्तर पारोळा यांचे न्यायालयात **मयत पांडुरंग खंडू चौधरी** यांचे रितसर वारस असल्याबाबत मे. न्यायालयाकडुन मान्यता मिळण्यासाठी व वारस जाहिर करुन मिळण्यासाठी **दि.कि. अ. नं. १५२/२०२५** दाखल केला आहे. तरी सर्व संबंधित व्यक्तींना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार हे **मयत पांडुरंग खंडू चौधरी** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत/वारस हक्काबाबत ज्या कोणी व्यक्तीस हरकत घ्यावयाची असेल त्या व्यक्तीने सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून एक महिन्याचे आत हरकती मे न्यायालयात दाखल कराव्यात तसेच असेही घोषित करण्यात येत आहे की,याप्रमाणे हरकती आल्या नाहीत तर अर्जदार हे **मयत पांडुरंग खंडू चौधरी** यांचे वारस असल्याबाबत पात्र समजुन त्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदर **अर्जाची चौकशी दिनांक २१/०८/२०२५ रोजी सकाळी १०.३०** वाजता ठेवण्यात आलेली आहे. सदर ज्या व्यक्तीस अर्जदाराचे वारस हक्काबाबत हरकत घ्यावयाची असेल त्यांनी मे.दिवाणी न्यायाधीश क. स्तर पारोळा, जि. जळगाव येथे स्वत: अगर वकिलामार्फत हजर रहावे. हजर न राहिल्यास न्यायालय योग्य ते आदेश पारीत करेल. येणेप्रमाणे जाहीर नोटीस होय सदरची नोटीस **आज दिनांक ०९/०७/२०२५ रोजी** माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

सही/- आदेशावरुन
कनिष्ठ लिपीक [कामगिरी] सही/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर,पारोळा जि. जळगाव

---

**CHANGE IN NAME**

MY OLD NAME IS PALLAVI SUNIL AMBADE BUT I HAVE CHANGED MY NAME MY NEW NAME IS PALLAVI SUNEEL AMBADE BOTH NAMES ARE FOR THE SAME PERSON BHUSAWAL 425201

---

**CHANGE IN NAME**

I have changed my name from YUSUF SHABBIR HUSAIN BOHRI to YUSUF SHABBIR EZZY

---

**NAME CHANGED**

I HAVE CHANGED MY NAME FROM SHAIKH ABDUL NAEEM ABDUL BASHIR (OLD NAME) TO SHAIKH ABDUL NAEEM ABDUL BASHIR SHAIKH (NEW NAME) AS PER DOCUMENTS, FOR ALL PURPOSES.

---

**जाहिर नोटीस** ॲड.सी.बी.लोहार

**जळगाव येथील मे २ रे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर जळगाव**

**दि.कि.अ.नं.२४८/२०२५**
**निशाणी ०७**
**चौकशी तारीख २९/०७/२०२५**

**अर्जदार -** १] दिपीका विलास पाटील, दिपीका मनोहर पाटील [पुर्वाश्रमिची] उ.व.२८धंदा घरकाम [२] चि.राज विलास पाटील, उ.व. ०८, धंदा शिक्षण, अर्जदार नं. १ स्वत:साठी व अर्जदार नं.२ ची अपाक म्हणून, रा. व्दारा जिजाबराव भिका देसले, रा. प्लॉट नं.५७, गट नं. ३०, मुक्ताई नगर, मानराज पार्क जळगाव ता. जि. जळगाव

**//विरुध्द//**

कोणीही नाही ..... **सामनेवाला**

**अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम चे २ व ३ अन्वये वारस दाखला मिळणेकामी**

१] जाहिर नोटीस देण्यात येते कि, अर्जदार हे सरनाम्यात वर दिलेल्या पत्यावर राहत असून त्यांचे शिवाय मयतास कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार नं. १ दिपीका विलास पाटील [ विवाह विच्छेदना अगोदर] [दिपीका मनोहर पाटील [पुर्वाश्रमिची ] यांचे पती व अर्जदार नं. ०२ यांचे वडिल **विलास अशोक पाटील हे दिनांक १४/०८/२०२४ रोजी [मृत्युप्रमाणपत्रा प्रमाणे ] रोजी अमळनेर जि. जळगाव येथे मयत झाले आहेत.** तसेच अर्जदार हेच मयताचे कायदेशिर वारस आहेत. **विलास अशोक पाटील हे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ** जळगाव, अमळनेर आगारात चालक या पदावर कर्यरत होते. यांच्या मृत्युपश्चात अर्जदार नं. ०२ हे मयताचे कायदेशिर वारस आहे. मयताच्या पश्चात मिळणारे सर्व सेवा शर्ती फायदे, अनुकंपतत्वावर नोकरी इ. बाबत व शासकीय, निमशासकिय व खाजगी कामाकरीता अर्जदारांना वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि उक्त लेखा वरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरील अर्जदारांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबित झाल्यास सदर अर्जदार यांना **मयत विलास अशोक पाटील यांचे वारस दाखला देण्यात येईल.** आज दिनांक **२०/०६/२०२५** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर नोटीस दिले असे.

सही/- कोर्टाचा शिक्का हुकूमावरुन
क. लिपीक सही/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर जळगाव

---

**जाहिर नोटीस** ॲड.एस.व्ही.देवतवाल

**जामनेर येथील सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर जामनेर यांचे कोर्टात जि. जळगाव**

**दि.कि.अर्ज नं. १४५/२०२५**
**निशाणी ०७**
**चौकशी तारीख २१/०८/२०२५**

**अर्जदार -** १] उषाबाई नामदेव नागणे,उ.व. ६५, धंदा घरकाम - मयताची पत्नी [२] शिवाजी नामदेव नागणे, उ.व. ४५ धंदा मजुरी - मयताचा मुलगा [३] सतीश नामदेव नागणे उ.व. ४१, धंदा मजुरी - मयताचा मुलगा, वरील सर्व १ ते ३ रा. शेदुर्णी ता. जामनेर जि. जळगाव

**//विरुध्द//**

कोणीही नाही ..... **सामनेवाला**

**अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ व ३ अन्वये अर्जदार नं. १ ते ३ हे मयत नामदेव दिनकर नागणे यांचे कायदेशीर वारस [legal heirs] आहे वारस दाखला मिळणेबाबत....**

या कामी अर्जदारातर्फे मे कोर्टात अर्ज असा की, १] असे की, **मयत नामदेव दिनकर नागणे** हे अर्जदार नं. १ चे पती आहेत. तसेच अर्जदार नं. २ व ३ हे वडील **मयत नामदेव दिनकर नागणे** आणि त्यांची पत्नी म्हणजेच अर्जदार नं. १ उषाबाई या दोन्हीचा मुलगा अपत्ये आहेत. **मयत दिनकर नागणे यांचा दि. ०४/१०/२०२२ ला शेंदुर्णी ता. जामनेर** येथील राहत्या पत्यावर नैसर्गिक मृत्यू झालेला आहे. **मयत नामदेव दिनकर नागणे** यांना आता केवळ अर्तदार नंबर १ ते ३ एवढेच कायदेशी वारस आहेत.[२] असे,की, अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय व खाजगी कामानिमित्त योजनांचा लाभ घेण्यासाठी मयत **नामदेव दिनकर नागणे** यांचे अर्जदार नं. १ ते ३ हे कायदेशीर वारस आहेत असे जाहीर करुन त्या अनुषंगाने तसा कायदेशीर वारस दाखला [Legal hairship Certificate ] मिळणे आवश्यक झाले आहे. [३] असे की, त्याअर्थी सदरील किरकोळ अर्जाचे कामी अर्जदार हे **मयत नामदेव दिनकर नागणे** यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरिक्त **मयत नामदेव दिनकर नागणे** यांना आणखी कोणी कायदेशीर वारस असल्यास योग्य तो पुरावा म्हणून दस्तऐवज व आपले लेखी म्हणणे देणेकामी स्वत: किंवा आपले वकीलांमार्फत **मे. कोर्टात दि. २१/०८/२०२५ रोजी प्रत्यक्ष** जाब देणेकामी व दस्तऐवज दाखल करणेकामी स्वतः हजर रहावे. हया जाहिरनात्योच तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस असल्याबद्दलचे सर्टिफिकेट देईल.आज दिनांक **१४/०७/२०२५** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर नोटीस दिले असे.

सही/- कोर्टाचा शिक्का हुकूमावरुन
क. लिपीक सही/-
सहा.अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तरजामनेर

---

**जाहीर नोटीस** ॲड.व्ही.के.पवार

**पारोळा येथील दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर, पारोळा.जि. जळगाव यांचे न्यायालयात**

**दि.कि.अर्ज नं.८५/२०२५**
**निशाणी १०**
**पुढील चौकशी तारीख - १४/०८/२०२५**

**अर्जदार:-**[१]शरद नथा सुर्यवंशी उ.व. ६६ कामधंदा घरकाम [२] योगीराज नथा पाटील उ. व. ६६ कामधंदा - धरकाम [३] बापु नथा पाटील उ. व. ६६, कामधंदा - घरकाम [४] जिजाबराव नथा सुर्यवंशी [ पाटील] उ. व. ६६, कामधंदा - घरकाम [५] विजय नथा पाटील उ. व. ६६, कामधंदा - घरकाम [६] देवकाबाई विनायक पाटील, उ. व. ६६ कामधंदा - घरकाम , १ ते ६ रा. म्हसवे ता. पारोळा जि. जळगाव [७] रामराव नथु उर्फ नथा पाटील, उ. व. ६६, कामधंदा - घरकाम, रा. पदमपुरा ता. जि. छ.संभाजीनगर [८[ अहिल्याबाई धुडकु पाटील, उ. व. ६६ कामधंदा - घरकाम, रा. मंगरूळ ता. पारोळा जि. जळगाव [९] भारतीबाई दिलीप पाटील, उ. व. ६६,कामधंदा घरकाम,रा. चोरवड ता. पारोळा जि. जळगाव [१०] सुरेश नथा पाटील, उ. व. ६६ ,कामधंदा - घरकाम, रा. पिंप्राळा जळगाव ता. जि. जळगांव

**//विरुध्द//**

कोणीही नाही ... **सामनेवाला**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII चे कलम २ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी अर्ज**

ज्याअर्थी **मयत नथा दौलत पाटील हे दिनांक १८/०७/२०११** रोजी मौजे म्हसवे ता.पारोळा जि.जळगाव येथे मयत झालेले असुन ते मौजे म्हसवे ता. पारोळा जि. जळगाव येथील रहिवासी होते.**मयत नथा दौलत पाटील** यांचे मृत्युनंतर अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामांकरिता त्यांचे कायदेशिर वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळणेकामी अर्जदार यांना मयताचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी पारोळा येथील म. दिवाणी न्यायाधिश क. स्तर पारोळा यांचे न्यायालयात **मयत नथा दौलत पाटील** यांचे रितसर वारस असल्याबाबत मे. न्यायालयाकडुन मान्यता मिळण्यासाठी व वारस जाहिर करुन मिळण्यासाठी **दि. कि. अ. नं. ८५/२०२५** दाखल केला आहे. तरी सर्व संबंधित व्यक्तींना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार हे **मयत नथा दौलत पाटील** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत/वारस हक्काबाबत ज्या कोणी व्यक्तीस हरकत घ्यावयाची असेल त्या व्यक्तीने सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून एक महिन्याचे आत हरकती मे न्यायालयात दाखल कराव्यात तसेच असेही घोषित करण्यात येत आहे की,याप्रमाणे हरकती आल्या नाहीत तर अर्जदार हे **मयत नथा दौलत पाटील** यांचे वारस असल्याबाबत पात्र समजुन त्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदर **अर्जाची चौकशी दिनांक १४/०८/२०२५ रोजी सकाळी १०.३०** वाजता ठेवण्यात आलेली आहे. सदर ज्या व्यक्तीस अर्जदाराचे वारस हक्काबाबत हरकत घ्यावयाची असेल त्यांनी मे.दिवाणी न्यायाधीश क. स्तर पारोळा, जि. जळगाव येथे स्वत: अगर वकिलामार्फत हजर रहावे. हजर न राहिल्यास न्यायालय योग्य ते आदेश पारीत करेल. येणेप्रमाणे जाहीर नोटीस होय सदरची नोटीस **आज दिनांक ११/०७/२०२५ रोजी** माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

सही/- आदेशावरुन
कनिष्ठ लिपीक सही/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर,पारोळा जि. जळगाव

## राजुरी बुद्रुकच्या सरपंचपदी अमृता पाटील बिनविरोध

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पिंपळगाव हरे** ✍ प्रतिनिधी



राजुरी बु!! ग्रामपंचायतच्या सरपंच पदी सौं. अमृता सतीश पाटील यांची बिनविरोध निवड झाली. शिंदाड मंडळ अधिकारी कीर्ती चौधरी यांच्या अध्येक्षते खाली सर्व कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी भागवत पाटील, बी. एम. पाटील, भारत हिम्मत पाटील, युवासेना उपजिल्हाप्रमुख (पान २ वर)



## महत्वाचे

### चोरी प्रकरणी दोन आरोपी अटकेत

**पारोळा–** शहरात काही दिवसांपूर्वी घडलेल्या मिठाच्या पोत्यांच्या चोरीप्रकरणी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगात फिरवत दोन चोरट्यांना अटक केली असून, चोरी गेलेला सर्व मुद्देमाल देखील हस्तगत करण्यात पोलिसांना यश आलं आहे. या कारवाईमुळे व्यापारी वर्गात समाधानाचं वातावरण निर्माण झालं आहे. दिनांक १२ जुलै २०२५ रोजी, पारोळा येथील बहिरम गल्लीतील रहिवासी आणि 'शिव प्रोविजन' दुकानाचे मालक शंकर बागनमल सिंधी (वय ६४) यांनी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती की, त्यांच्या दुकानातून टाटा नमक कंपनीच्या मिठाची १२ पोती अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली आहेत. या पोत्यांची अंदाजित किंमत १६,८०० रुपये इतकी होती. ही चोरी ४ आणि ५ जुलैच्या रात्री घडल्याचा अंदाज असून, नगर परिषद परिसरातील दुकान परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणीस घेण्यात आले. तपास करत असताना, हेड कॉन्स्टेबल संजय पवार व पोलीस अमलदार अजय बाविस्कर यांनी मिळवलेल्या फुटेजमधील संशयित व्यक्तींचे फोटो सोशल मीडियावर प्रसारित केले. त्यानंतर एक गोपनीय बातमीदार पुढे आला आणि दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी श्रद्धा नगर, गलवाडे रोड, अंमळनेर येथील राजू पंडित बच्छाव आणि रमेश जाधव उगरेच्छा यांना ताब्यात घेतले. सखोल चौकशीत त्यांनी चोरीची कबुली दिली.

### रोकडसह दागिन्यांची चोरी

**जळगाव –** शहरातील मुकुंद नगर येथे राहणाऱ्या एका वृद्धाचे बंद घर फोडून घरातून सोन्या चांदीचे दागिने आणि रोकड असा ऐकून ६१ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना आले आहे. या संदर्भात रात्री एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, अरुण लक्ष्मण शेटे वय ६४ रा. मुकुंदनगर जळगाव हे वृद्ध आपल्या कुटुंबीयांसह वास्तव्याला आहेत. दरम्यान २७ जून ते ११ जुलै या कालावधीमध्ये त्यांचे घर बंद असताना अज्ञात चोट्यांनी त्यांच्या घराच्या दरवाजाचे कडी कोयंडा तोडून आत प्रवेश करत घरातून सोन्या चांदीचे दागिने आणि रोकड असा एकूण ६१ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला. ही घटना उघडकीला आल्यानंतर अरुण शेटे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्यादीवरून दिली. त्यानुसार रात्री ११ वाजता आज्ञा चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे या घटनेचा पुढील पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत धनके करीत आहे.

### जळगावात दुपारी जोरदार पाऊस

**जळगाव –** शहरात दुपारी सलग एक तास जोरदार पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसामुळे शहरातील नाकारीकांची तारांबळ उडाली होती. दि. १३ रोजी देखील देखील अश्याच जोरदार पावसाने अचानक हजेरी लावली. यामुळे अनेक रस्त्यांवर पाणी साचले असून नागरिकांचा गोंधळ उडला.

# लोकवर्गणीसह शिक्षणकर कमी करा : अमळनेरकर आक्रमक

### कायदेशीर बाबी तपासून न्याय देणार : मुख्याधिकारी नेरकर यांची बैठकीत ग्वाही

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**अमळनेर** ✍ प्रतिनिधी

गेल्या १३ वर्षांपासून सक्तीने वसूल करण्यात येणारी लोकवर्गणी रद्द करा आणि जळगाव महापालिकेच्या तुलनेत १४ टक्के जादाचा नपा शिक्षण कर कमी करा अशी आक्रमक भूमिका अमळनेरकरांनी दुसऱ्या दिवशी घेतली. त्यावर मुख्याधिकारी तुषार नेरकर यांनी हे सर्व कर आधी झालेल्या ठरावानुसार असून ते कमी करता येतील का याबाबत कायदेशीर बाबी तपासून जनहिताचे निर्णय घेतले जातील असे आश्वासन दिले. शहर हद्दीतील ज्या नवीन मालमत्ता धारकांना नोटीस मिळाली आहे, त्यांना हरकती घेण्याची संधी असून त्यांनी हरकती घ्याव्यात, यासाठीच ती नोटीस आहे, आणि सदर नोटीस कराच्या कक्षेत नसलेल्या ४१८७ मालमत्ता



धारकानाच नोटीस दिली आहे. यासंदर्भात आमदार अनिल पाटील यांनी देखील बैठक घेण्याचे निर्देश दिले असून कायदेशीर बाबी तपासून कुणावरही अन्याय होणार नाही याची काळजी घेतली जाईल, अशी ग्वाही मुख्याधिकारी तुषार नेरकर यांनी नगरपरिषदेत आयोजित बैठकीत दिली. मालमत्ता कर वाढी संदर्भात अमळनेर शहर व पत्रकार संघाच्या वतीने रविवारी सहविचार सभा पार पडल्यानंतर दुसऱ्या दिवशी पत्रकार संघाच्या नेतृत्वात सर्वपक्षीय पदाधिकारी, माजी नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी बांधव आणि मालमत्ता धारक मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यासाठी सकाळी ११ वाजता पालिकेत पोहोचले. तत्पूर्वी पत्रकार संघाच्या विनंती नुसार मुख्याधिकारी नेरकर यांनी सर्वांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी पालिका सभागृहात बैठक घेतली. यावेळी उपमुख्याधिकारी श्री चव्हाण व इतर विभाग प्रमुख उपस्थित होते. यासंगी संजय पाटील यांनी जळगाव व अमळनेर येथील करात असलेली मोठी तफावत मांडत सहविचार सभेच्या मागणीनुसार अमरावती येथील संस्थेस दिलेला सर्वेक्षणचा ठेका रद्द करून कर वाढ रद्द करण्याची मागणी केली. प्रशांत निकम यांनी मालमत्ता हस्तांतरण साठी २ टक्के मूल्य कमी करा, लोकवर्गणी शून्य करा, अन्यथा जनहित याचिका दाखल करण्याचे (पान २ वर)

## रावेर तालुक्यातील तरुणाची सोशल मीडियावर लाखो जणांना भुरळ



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**रावेर** ✍ प्रतिनिधी

सध्या सोशल मीडियावर आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या अनेक कलाकारांमध्ये रावेर तालुक्यातील पुनखेडा येथील तुषार रामचंद्र कोळी यांचे नाव विशेष चर्चेत आहे. त्यांचे अनोखे अभिनय आणि दैनंदिन जीवनातील प्रसंग सादर करण्याची शैली लोकांच्या मनात घर करून गेली आहे. (पान २ वर)

## 'क्षितिज हा' उपक्रमात विद्यार्थ्यांचे समुपदेशन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**शेंदुर्णी ता. जामनेर** ✍ प्रतिनिधी

धी. शेंदुर्णी से. एज्यु. को-ऑप सोसा. लि. संचलित, आ. ग. र गरुड माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय शेंदुर्णी येथे, साकार संस्था छत्रपती संभाजीनगरच्या वतीने''क्षितिज या उपक्रमांतर्गत इयत्ता ८ वी ते १० वीतील किशोरवयीन विद्यार्थी व विद्यार्थिनींचे समुपदेशन शिबिर घेण्यात आले. साकार संस्था एक सामाजिक दृष्टिकोन ठेवून किशोरवयीन मुला मुलींनी विधायक विचारधारेने स्वत:मधील बदल



स्वीकारू मित्र-मैत्रिण राहून समाजात सकारात्मक बदल घडवून आणावा यासाठी ही संस्था कार्य करीत असते. तरी गरुड विद्यालयात देखील अशाच पद्धतीच्या शिबिराचे आयोजन १ते ४ सत्रात करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे चेअरमन संजय गरुड यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यालय सुसज्ज व सुविधायुक्त असून देखभाल म्हणून सी. सी. टी. व्ही. कॅमेरे व इतर तत्पर सुविधा विद्यालयात उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य/ मुख्या. आर एस चौधरी यांनी केले. तर विद्यार्थ्यांना विविध विषयावर गुड टच बॅट टच, मुला, मुलीं (पान २ वर)



## पंचायत समितीकडून नागरिकांना होणाऱ्या गैरसोयी थांबवा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पारोळा** ✍ प्रतिनिधी

पारोळा पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागांची आढावा बैठक शनिवार रोजी आमदार अमोल पाटील यांचा अध्यक्षतेखाली पार पडली. याप्रसंगी गटविकास अधिकारी संजय मोरे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. चंद्रकांत सुर्यवंशी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. पारोळा पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागांची आढावा बैठक पंचायत समितीच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. पंचायत समिती (पान २ वर)



## पिंपळगाव पोलीसांचा शाळेमध्ये स्तुत्य उपक्रम

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**शिंदाड** ✍ प्रतिनिधी

पाचोरा तालुक्यातील पिंपळगाव हरेश्वर येथील ग्राम विकास विद्यालय हायस्कूलमध्ये पोलिसांनी मुलींसाठी नुकताच गुड टच बॅड टच तसेच अंतर्गत कायद्याची मुलींना माहिती देण्यात आली. सविस्तर असे की सध्या मुलींच्या सुरक्षितेचा प्रश्न अनेक ठिकाणी ऐरणीवर आलेल्याचे दिसून येतेय. महाराष्ट्रात अनेक मुलींच्या संदर्भात अत्याचाराच्या घटना घडलेल्या आपणास दिसत आहेत. त्याच अनुषंगाने माध्यमिक शाळेतील विद्यार्थिनींना कोणी स्पर्श करत असेल तर तो स्पर्श कोणत्या अर्थाने आहे. याचा अंदाज मुलींना यायला पाहिजे. याच माध्यमातून स्त्री पोलिसांनी मुलींना गुड टच कोणता समजावा आणि बॅड टच कोणता समजावा. या संदर्भात सखोल (पान २ वर)

## वैद्यकीय अधिकारी डॉ.राजेश सोनवणे यांचा गौरव

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जामनेर** ✍ प्रतिनिधी

राष्ट्रीय लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्याकडून जामनेर तालुक्यात कुटुंब नियोजनाचे उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश सोनवणे यांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. तालुक्यातील वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप कुमावद, डॉ. किरण पाटील यांना सुद्धा प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. जामनेर तालुक्यात जिल्हा



आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर यांच्या मार्गदर्शनाखाली दर आठवड्याला कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया कॅम्प चे आयोजन करण्यात येते. एक दिवस आधी लाभार्थ्यांना ॲडमिट करून त्याच्यावर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात येते. जामनेर तालुक्यात मागील वर्षात एकूण ८ पुरुष नसबंदी शक्रक्रिया, १०५ लेप्रोस्कोपी शस्त्रक्रिया, १०८२ स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया अशा एकूण ११९५ शस्त्रक्रिया करण्यात आल्या. तसेच शस्त्रक्रिया न करता (पान २ वर)

## समाजाच्या विकासासाठी संघटन काळाची गरज

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**रावेर** ✍ प्रतिनिधी



वाघोदा येथे झालेल्या अखिल भारतीय जीवा सेना रावेर तालुका १५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या दहावी बारावी गुणगौरव सोहळा तसेच मानाचा नाभिक हिरकणी पुरस्कार व शिवरत्न वीर जिवाजी महाले पुरस्कार याबद्दल चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सुरेश ठाकरे तंटामुक्ती अध्यक्ष हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय जीवा सेना जळगाव जिल्हाध्यक्ष गणेश सेठी होते. यानंतर अखिल भारतीय जीवा सेना रावेर तालुक्याची नवीन कार्यकारणी करण्यात आली. यामध्ये तालुकाध्यक्षपदी सुरेंद्र शिरनामे यांची निवड करण्यात आली. तर (पान २ वर)

## आमदार मनोज कायंदे यांची विधिमंडळात लक्षवेधी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**देऊळगाव राजा** ✍ प्रतिनिधी

देऊळगाव राजा जाफराबाद बायपास वरील वळण रस्त्यावरील अपघात मालिका थांबविण्यासाठी विधिमंडळात आवाज उठविणारे आमदार मनोज कायंदे हे दुसरे आमदार असल्याने तत्कालीन शिंदे सरकार मधे संतोष दानवे तर विद्यमान फडणवीस सरकार मधे कायंदे यांनी आवाज उठविला. आमदार मनोज कायंदे हा प्रश्न मार्गी लावतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात



आहे. शहराबाहेरून वळण रस्त्यावर जालना जिल्ह्यातील जाफराबाद कडून येणारी वाहने आणि जालना चिखलीकडे येणारी वाहने आणि देऊळगाव राजा शहरातून येणारी वाहने या संजय नगरच्या वळण रस्त्याला कर्वे नसल्याने रोजनिशी अपघाताची मालिका सुरू आहे. सदर अपघातावर नियंत्रण मिळविण्यासाठी तत्कालीन शिंदे सरकार मधे जाफराबाद भोकरदन विधानसभा मतदार संघाचे आमदार संतोष रावसाहेब दानवे यांनी सिंदखेडराजा विधानसभा क्षेत्रात असलेला वळण रस्त्यावर अपघात आणि त्यावर उपाययोजना बाबत विधिमंडळात लक्षवेधी उपस्थित करून त्या लक्षवेधी ला त्यावर उपाययोजना केल्या जाईल असे उत्तर दिले होते.

तेंव्हा आमदार डॉक्टर राजेंद्र शिंगणे असतांना दानवे यांनी प्रश्न उपस्थित केल्याने शिंगणे यांच्यावर मान खाली घालायची वेळ आली होती. म्हणूनच की काय उपाययोजना झाल्या नाही. आमदार बदलल्या गेले आणि पुन्हा तोच प्रश्न आमदार मनोज कायंदे यांनी विधिमंडळात उपस्थित केला आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासंदर्भात मागणी केली. त्यामुळे प्रश्न एक आमदार दोन, नेमके प्रश्न सोडविणार कोण ? या कडे लक्ष लागून आहे.

## पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपण गरजेचे : डॉ.सोनवणे

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**यावल** ✍ प्रतिनिधी

जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वृक्षारोपण उपक्रम सामाजिक वनीकरण विभाग यावल व महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला. यात प्रादेशिक वन अधिकारी सुनील पाटील तसेच महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे व वन विभागातील सहकारी



अधिकारी यांच्या शुभ हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांनी मार्गदर्शनात प्रत्येक सजीवांसाठी हवा व ऑक्सिजन उपयुक्त असते. यात वृक्षावरील प्रत्येक पान हे प्रकाश संश्लेषण प्रक्रिये द्वारे वातावरणात ऑक्सिजन सोडतात व स्वत:चे अन्न स्वत: तयार करतात या प्रक्रियेमुळे वातावरणात ऑक्सिजन सोडला जातो. वातावरणातील ऑक्सिजन प्रत्येक सजीव घेऊन आपले जीवन सुरळीत चालवत आहेत. याद्वारे पर्यावरण संतुलन होते म्हणून पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपण करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. याप्रसंगी प्रादेशिक वन अधिकारी सुनील पाटील यांनी वन महोत्सव (पान २ वर)

# रोटरीचे सेवाकार्य गरजूंच्या जीवनात परिवर्तन घडविते

### सुब्रमण्यम यांचे गौरवोद्गार : रोटरी वेस्टचा ३३ वा पदग्रहण सोहळा उत्साहात

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** ✍ प्रतिनिधी

कोणतेही सेवाकार्य छोटे किंवा मोठे नसते, तर त्यासाठी केलेली कृती, भावना ही गरजू व्यक्तींच्या जीवनात मोठे परिवर्तन घडवत असते असे रोटरी इंटरनॅशनलचे संचालक टी. एन. सुब्रमण्यम यांनी प्रतिपादन केले. मायादेवी नगरातील रोटरी भवन मध्ये झालेल्या रोटरी क्लब ऑफ जळगाव वेस्टच्या ३३ व्या पदग्रहण सोहळ्यात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. सहप्रांतपाल संजय गांधी यांची यावेळी विशेष उपस्थिती होती. एकटा व्यक्ती मोठे काम करू शकत नाही. अनेक व्यक्तींनी एकत्र येऊन मनाने, प्रेमाने सेवा कार्य केल्यास वंचितांच्या जीवनातील काळोख दूर होऊन सेवेचा दीप प्रज्वलित होतो. अनेकांना जीवनदान मिळते. त्यांच्या जीवनात अमुलाग्र बदल होऊन मोठे परिवर्तन घडते, असे सुब्रमण्यम यांनी सांगत रोटरीने मुंबईत राबविलेल्या भविष्ययान प्रकल्पाचे उदाहरणही सांगितले.




विनीत जोशी यांनी गौरव सफळे यांना अध्यक्षपदाची तर भद्रेश शाह यांनी महेश सोनी यांना प्रशासकीय सचिव पदाची सूत्रे दिलीत. तुषार तोतला यांनी देवेश कोठारी यांना प्रकल्प सचिवपदाची तर उमेश महाजन यांनी सागर पाटील यांना सार्जंट ॲट आर्म्सपदाची सूत्रे दिलीत. भद्रेश शाह व तुषार तोतला यांनी सेवेची वारी हा सेक्रेटरी रिपोर्ट सादर केला. विनीत जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्ष गौरव सफळे यांनी रोटरी वर्ष २०२५ - २६ मधील होणाऱ्या कार्याबद्दल व्हिजन मांडले. ॲड. सुरज जहांगीर यांनी नूतन कार्यकारणी व समिती प्रमुखांच्या नावांची घोषणा केली. उपाध्यक्ष अतुल कोगटा यांनी नवीन सदस्यांची ओळख करून दिली.

यावेळी अविनाश सोनी यांनी रोटरी फाउंडेशनच्या कार्यासाठी १ हजार डॉलरच्या रकमेचा धनादेश मान्यवरांना दिला. संजय गांधी यांनी प्रांतपाल ज्ञानेश्वर शेवाळे यांच्या संदेशाचे वाचन केले. अनय सफळे या लहान मुलाने पोस्टमनच्या पोशाखात आणलेल्या संवाद या क्लब बुलेटीनचे प्रकाशन करण्यात आले. रेविका सोनी या चिमुरडीने नृत्यद्वारे गणेश वंदना प्रस्तुत करीत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. सूत्रसंचालन सरिता खाचणे व देवांशी कोठारी यांनी तर आभार प्रेसिडेंट इलेक्ट योगेश राका यांनी मानले.





# ब्रिक्स शिखर परिषद : पार्श्वभूमी आणि उद्देश

**भाग एक**

''अधिक समावेशक आणि शाश्वत प्रशासनासाठी जागतिक दक्षिण सहकार्य मजबूत करणे'' या थीम अंतर्गत ब्राझीलमधील रिओ दि जानेरो येथे झालेल्या १७ व्या ब्रिक्स शिखर परिषदेचे हे उद्दिष्ट्य असले तरी त्यांना भविष्यातील गुंतागुंत, आव्हानांना आणि समस्यांना सामोरे जावे लागणार आहे आणि ब्रिक्स आपली संस्थात्मक क्षमता आणि नेतृत्व भूमिका कशी वाढवू शकते? या विषयीचाच घेतलेला हा आढावा.

**पार्श्वभूमी :**

बलाढ्य/शक्तिशाली देशांच्या यादीत ज्या देशांची नावे येतात अश्या पाच देशांच्या इंग्रजी अक्षरातील आद्य अक्षराने ब्रिक्स (BRICS) म्हणजेच (Brazil, Russia, India, China and South Africa) या संस्थेची स्थापना २०१० मध्ये झाली. या पाचही देशानंचा वाढत जाणारा वृद्धिदर आणि विकास तसेच यांच्याकडे असलेली नैसर्गिक साधनसंपत्ती यामुळे शक्तिशाली देशांनमध्ये या देशांचा समावेश तर आहेच पण त्याच बरोबर जगाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनातील (जीडीपी) २७% जीडीपी तर जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी ४२% लोकसंख्या आणि जागतिक भूमीच्या २६% भूमी हि या पाच देशांची आहे. एस बी आय च्या संशोधनाच्या विश्लेषणानुसार, अर्जेंटिना, इजिप्त, इथिओपिया, इराण, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीच्या प्रस्तावित सदस्यत्वामुळे पाच सदस्यीय ब्रिक्स (ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका) या गटाचा वाटा वाढेल. जागतिक जीडीपी सध्याच्या २६ टक्क्यांवरून ३० टक्क्यांवर आणि लोकसंख्येचा वाटा ४० टक्क्यांवरून ४६ टक्क्यांवर गेला आहे.

**ब्रिक्स प्लस सिक्स :**

ब्रिक्स मध्ये सामील झालेल्या या सहा देशांचा विचार केल्यास अर्जेंटिना ची प्रमुख निर्यात अजूनही कृषी उत्पादने आहेत, विशेषत : धान्य; पेट्रोलियम, यंत्रसामग्री आणि वाहतूक उपकरणे आणि रसायने देखील महत्त्वाची आहेत. त्याच्या आयातीपैकी निम्मी, मूल्यानुसार, यंत्रसामग्री आणि वाहतूक उपकरणे आहेत. इजिप्तची अर्थव्यवस्था प्रामुख्याने नाईल नदी, शेतीयोग्य जमीन, नैसर्गिक वायू आणि पर्यटन यांसारखी नैसर्गिक संसाधने आहेत. तसेच इजिप्त हा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा दुसरा सर्वात मोठा ग्राहक आहे. इथोपिया हा देश प्रचंड मानव संसाधन, शेतीयोग्य जमीन, पशुधन आणि नैसर्गिक संसाधनांनी संपन्न आहे. इराणच्या अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्य हायड्रोकार्बन, कृषी आणि सेवा क्षेत्रे तसेच उत्पादन आणि वित्तीय सेवांमध्ये अग्रेसर आहे. नैसर्गिक वायू साठ्यांमध्ये इराण जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि कच्च्या तेलाच्या सिद्ध साठ्यांमध्ये चौथ्या क्रमांकावर आहे. सौदी अरेबिया हा जगातील सर्वात मोठा पेट्रोलियम निर्यातदार आणि त्याच्याशी संबंधित उद्योगांचे वर्चस्व असलेला देश आहे. सौदी अरेबियाकडे जगातील पेट्रोलियम साठ्यापैकी सुमारे १७ टक्के साठा आहे. यूएई ही मध्य पूर्वेतील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. तसेच कृषी व्यवसाय, पर्यटन, आरोग्य आणि संसाधने क्षेत्रातील सर्वात




श्रीमंत देशांपैकी एक आहे. तेल साठ्यांच्या एकूण जागतिक पुरवठ्यापैकी १० टक्के आणि जगातील पाचव्या क्रमांकाचा नैसर्गिक वायू साठा यूएई कडे आहे. तेल निर्यातीचा वाटा एकूण यूएई च्या एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या सुमारे ३० टक्के आहे.

१७ व्या ब्रिक्स परिषदेत इंडोनेशिया अधिकृतपणे ब्रिक्समध्ये सामील झाला, तर बेलारूस, बोलिव्हिया, कझाकस्तान, क्युबा, नायजेरिया, मलेशिया, थायलंड, व्हिएतनाम, युगांडा आणि उझबेकिस्तान यांचे ब्रिक्स भागीदार देश म्हणून स्वागत करण्यात आले.

**प्रमुख मुद्दे :**

१७ व्या ब्रिक्स शिखर परिषदेतील खालील प्रमुख मुद्द्यांवर चर्चा आणि मान्यता देण्यात आली.

**जागतिक प्रशासन सुधारणा :**

ब्रिक्सने जागतिक दक्षिण प्रतिनिधित्वासाठी आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील अधिक स्थायी सदस्यांचा समावेश करण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या विस्ताराला पाठिंबा दिला. उदयोन्मुख बाजारपेठा आणि विकसनशील देशांच्या (EMDCs) भूमिकेचे प्रतिबिंबित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) आणि जागतिक बँकेच्या (WB) सुधारणांना आवाहन केले आणि नियमांवर आधारित असलेल्या जागतिक व्यापार संघटना (WTO) ला पाठिंबा दिला. समकालीन जागतिक वास्तव प्रतिबिंबित करण्यासाठी संस्थात्मक सुधारणांना समर्थन देण्यात आले.

**शाश्वत विकास :**

शाश्वत विकास साधण्यासाठी तसेच विकसनशील देशांसाठी संसाधने एकत्रित करण्यासाठी ब्रिक्सने हवामान वित्तपुरवठ्यावरील नेत्यांच्या फ्रेमवर्क घोषणापत्राचा स्वीकार केला आणि शून्य कार्बन आणि उत्सर्जन व्यापारात सहकार्य वाढविण्यासाठी ब्रिक्स कार्बन मार्केट्स भागीदारीवरील सामंजस्य कराराला देखील मान्यता दिली. शिखर परिषदेत ''ब्रिक्स क्लायमेट लीडरशिप अजेंडा'' आणि पर्यावरण संवर्धनासाठी नाविन्यपूर्ण वित्तपुरवठा यंत्रणेची मान्यता यासह व्यापक हवामान चौकटी सादर करण्यात आल्या.

**शांतता आणि सुरक्षा :**

ब्रिक्सने ''आफ्रिकन समस्यांवरील आफ्रिकन उपाय'' पुन्हा पुष्टी केली, गाझा युद्धविराम आणि द्वि-राज्य उपायाची मागणी केली. ब्रिक्स नेत्यांनी पहलगाम हल्ल्याचा निषेध केला आणि भारताने यावर भर दिला की दहशतवादाला तत्त्वतः नाकारले पाहिजे. यासाठी शांतता, सुरक्षा आणि जागतिक स्थिरता वाढवणे या घोषणेत वाढत्या जागतिक लष्करी खर्च आणि चालू असलेल्या प्रादेशिक संघर्षांबद्दल चर्चा करण्यात आली. आंतरराष्ट्रीय सुरक्षा आव्हानांसाठी बहुपक्षीय दृष्टिकोनांवर भर देण्यात आला.

**आर्थिक आणि आर्थिक सहकार्य :**

व्यापार संबंधांमध्ये विविधता आणण्यासाठी आणि पर्यायी पेमेंट प्रणाली विकसित करण्यासाठी यंत्रणांचा शोध घेण्यात आला. या उपक्रमांचा उद्देश दक्षिण-दक्षिण आर्थिक सहकार्याला चालना देताना पारंपारिक आर्थिक संरचनांवरील अवलंबित्व कमी करणे आहे. थोडक्यात ब्रिक्सने अमेरिकन डॉलर अवलंबित्व कमी करण्यासाठी क्रॉस-बॉर्डर पेमेंट इनिशिएटिव्हवर चर्चा करत न्यू डेव्हलपमेंट बँकेच्या विस्ताराला आणि गुंतवणूकींना धोका कमी करण्यासाठी ब्रिक्स बहुपक्षीय हमी (BMG) पायलटला पाठिंबा दिला.

**तंत्रज्ञान आणि डिजिटल अर्थव्यवस्था :**

ब्रिक्सने जागतिक एआय प्रशासन प्रथमच प्रामुख्यने विचारात घेण्यात आले. ज्यामध्ये नेत्यांनी जागतिक दक्षिण दृष्टिकोन आणि विकासाच्या गरजा विचारात घेणाऱ्या समावेशक आंतरराष्ट्रीय चौकटींसाठी प्रयत्न केले. डेटा इकॉनॉमी गव्हर्नन्स अंडरस्टँडिंग आणि सहयोगी अवकाश शोधासाठी ब्रिक्स स्पेस कौन्सिल स्थापन करण्यास सहमती देण्यात आली. भारताच्या तांत्रिक क्षमता अशा सहकार्यासाठी योग्य आहेत. देशाच्या डिजिटल पेमेंट सिस्टम आणि ब्लॉकचेन प्लॅटफॉर्म आंतरराष्ट्रीय व्यापारात तांत्रिक नवोपक्रमाचे व्यावहारिक अनुप्रयोग प्रदर्शित करून सुधारित क्रॉस-बॉर्डर व्यवहार सक्षम करत आहेत.

**आरोग्य आणि सामाजिक विकास :**

आरोग्य विषमता दूर करण्यासाठी ब्रिक्सने सामाजिकदृष्ट्या निर्धारित रोग (क्षयरोग) निर्मूलनासाठी लक्ष केंद्रित करण्यात आले



डॉ. रिता मदनलाल शेटीया
लेखिका, अर्थशास्त्र (प्राध्यापिका), पुणे
मेल.drritashetiya१४@gmail.com




संकलन संयोजन
राहुल पवार ८८०६८८६१६६
कविता ठाकरे ९७६५१३६८७५

# तरुणांनी राजकारणात उतरायला हवं..

**तरुणांनी राजकारणात उतरणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण त्यांच्यात नवे विचार, ऊर्जा आणि परिवर्तनाची इच्छा असते. तरुणांचा आवाज समाजाच्या** विविध प्रश्नांवर अधिक लक्ष वेधण्यास मदत करतो आणि त्यांचे योगदान राजकारणाला अधिक गतिशील बनवतात.यामुळे अनेक फायदे होऊ शकतात तरुणांकडे नवीन दृष्टीकोन आणि विचारधारा असते, ज्यामुळे पारंपारिक राजकारणात नव्यता आणता येते. समाजातील विविध समस्यांना सामोरे जाण्यासाठी नवीन उपाय शोधने त्यांच्यामध्ये परिवर्तनाची आस असते. तरुणांना अद्ययावत विचार आणि नवा दृष्टिकोन असतो. ते समाजातील विविध समस्यांसाठी नव्या उपाययोजना सुचवू शकतात. जेव्हा तरुण राजकारणात भाग घेतात, तेव्हा ते आपल्या भविष्याच्या संदर्भात निर्णय घेण्यात मदत करतात. त्यांच्या विचारधारेमुळे दीर्घकालीन आणि सकारात्मक बदल साधता येऊ शकतो.

तरुणांच्या सहभागामुळे राजकारणात समाजातील विविध मुद्दे अधिक चांगल्या प्रकारे समोर येऊ शकतात. ते इतर तरुणांना प्रेरित करतात आणि जागरूकता वाढवतात. अनेकदा, तरुणांना त्यांच्या मतदारांच्या समस्यांची अधिक चांगली माहिती असते, त्यामुळे ते अधिक विश्वासार्हता मिळवतात. तरुणांचा अनुभव विविध क्षेत्रांमध्ये असतो,




ज्यामुळे त्यांना समस्या सोडवण्यात मदत मिळते. तरुणांचा राजकारणात सहभाग म्हणजे केवळ व्यक्तीगत फायदा नाही, तर यामुळे संपूर्ण समाजाची प्रगती होते.

तरुणांना आधुनिक समस्या आणि तंत्रज्ञानाबद्दल चांगला ज्ञान असतो. त्यामुळे ते नव्या उपाययोजना सुचवू शकतात.तरुण पिढीमध्ये सामाजिक मुद्द्यांबद्दल जागरूकता अधिक असते. त्यांनी राजकारणात प्रवेश केल्यास विविध सामाजिक न्यायाच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले जाऊ शकते. तरुणांच्या सक्रियता मुळे इतर तरुणांचे मतदानाबद्दल जिव्हाळा वाढू शकतो, ज्यामुळे व्यापकपणे लोकशाहीत अधिक प्रतिसाद येऊ शकतो.राजकारणात तरुणांचे योगदान केवळ नेतृत्वातच नाही तर पॉलिसीसाठी नवीन संशोधन आणि नवोपक्रम देखील आणू शकते. एकूणच, तरुणांची राजकारणात भागीदारी शेवटी एक सकारात्मक बदल घडवू शकते आणि एक समृद्ध भविष्य निर्माण करण्यात सहायक ठरते.तरुणांमध्ये काम करण्याची ऊर्जा आणि उत्साह असतो, जो राजकारणात आवश्यक आहे. त्यांच्या पिढीच्या समस्या आणि आव्हानांची चांगली ओळख असते, ज्यामुळे ते अधिक प्रभावी निर्णय घेऊ शकतात.सोशल मीडिया आणि तंत्रज्ञानाच्या वापरात तरुण प्रगत असतात, ज्यामुळे ते अधिक लोकांपर्यंत पोहोचू शकतात. तरुणांनी राजकारणात सक्रिय सहभाग घ्यावा, कारण त्यांद्वारे समाजात सकारात्मक बदल घडवता येतील.



श्रीकांत संभाजी मगर
नांदेड
९६८९११७१६९

# ''प्रेम करावे पाहून''

एकदाच मानवास लाभे जीवन
प्रेम करावे पाहून
नजरेला नजर देऊन
हृदयातल्या भावनांचा
आदर करून
प्रेम करावे पाहून..

नसेल जमत द्यावं
तिथंच सोडून
पुढच्या वाटेवर
कोणास ठाऊक
निराश न होता
आशावाद कायम ठेवून
प्रेम करावे पाहून..

हाती आलेला हात
कधी न द्यावा सोडून
जीवन वाटचालताना
प्रत्येक पाऊल पुढे ठेवून
प्रेम करावं पाहून..

जीवन सन्मान आत्मभान ठेवून
जसं आहे तसं स्वीकारून
प्रीतीला प्रेमाची करून
त्याग समर्पणाची भावना ठेवून
प्रेम कराव पाहून..

कायम राहावा विश्वास मनात
घ्यावं एकमेकांना समजून
प्रेम करावं पाहून..
घर बघावं बांधून..



अशोक सोनवणे
पिंपरी चिंचवड

# रानमाठाचं पिठलं : पारंपरिक रानभाजी

**रानमाठाचं पिठलं ही एक पारंपरिक, चवदार आणि औषधी गुणधर्म असलेली रानभाजीची रेसिपी आहे. ही भाजी विशेषतः पावसाळ्यात आणि शेतात काम करणाऱ्या कष्टकरी वर्गासाठी केली जाते. शरीराला उष्णता देणारी, सुलभ पचन करणारी आणि ताकद देणारी ही खास कोकणीमराठी घरांतील डिश आहे.**

**साहित्य (२३ जणांसाठी) :**

रानमाठाची भाजी १ मोठी वाटी (स्वच्छ धुतलेली, बारीक चिरलेली)
हरभऱ्याचं पीठ (बेसन) ४ टेबलस्पून
कांदा १ मध्यम (बारीक चिरलेला)
लसूण ५६ पाकळ्या (ठेचलेली)
हिरव्या मिरच्या २३ (तुकडे करून)
हळद चमचा
मीठ चवीनुसार
तेल २ टेबलस्पून
फोडणीसाठी : मोहरी, जिरे, हिंग
कोथिंबीर ऐच्छिक
पाणी १ कप

**कृती :**

१. रानमाठ ही पानांच्या रंगावरून वेगळी ओळखता येते गडद हिरवी व पातळ देठाची. ती स्वच्छ धुऊन बारीक चिरून घ्या.
२. कढईत तेल गरम करून त्यात मोहरी, जिरे, हिंग घाला. मग लसूण, मिरच्या, आणि कांदा घालून परतवा. कांदा पारदर्शक झाला की भाजी घाला.
३. चिरलेली रानमाठ भाजी घालून चांगली परतून घ्या. थोडंसं पाणी शिंपडून झाकण ठेवून ५७ मिनिटं शिजवा.
४. एका छोट्या वाटीत बेसन थोडं पाणी घालून मिसळा गुठळ्या न होता सैलसर मिश्रण करा. हे मिश्रण शिजलेल्या



भाजीवर घाला. चवीनुसार मीठ, हळद घालून मध्यम आचेवर ५ मिनिटं ढवळत शिजवा.
५. पिठलं घट्टसर, पण ओलसर वाटल्यास चांगलं जमलंय असं समजा. वरून हवं असल्यास कोथिंबीर घालावी.
६. गरम गरम पिठलं, बाजरीची भाकरी आणि लसूण चटणी ही शुद्ध ग्रामीण थाळी. ताकासोबत घेतल्यास अजून पचनास योग्य.

**औषधी उपयोग :**

रानमाठ ही भाजी विटॅमिन ए, सी आणि आयर्न युक्त असते.
बेसनामुळे प्रोटीन भरपूर मिळतं.
लसूण व मिरच्यांमुळे ही भाजी सर्दी, अपचन, आणि थंडीच्या त्रासांपासून संरक्षण करते.

**टीप :**

भाजी फार पाणीदार नको पिठल्याचं एकसंधपण महत्वाचं असतं.
खवखवट किंवा खरजणाऱ्या त्वचेसाठी रानमाठ फायदेशीर मानतात.



अपर्णा स्वप्निल कांबळे-नांगरे
पत्रकार/फुड ब्लॉगर, मुंबई
मो. ९८९२१३८१३२

# गाव विकासात, भ्रष्टाचारी अडथळा

**भाग – ५९**

तात्या, आपला गावना मानूस, गावना चांगला कामे करी, असं समजीसन मना याहीना गाव वालास्नी गाव इकास कामेस्ना ठेका त्याले दिना. तर तो गडी काम बोगस करीसन वरतून, दमबाजी करी ऱ्हायना. आहो शासन ना पैसा गाव इकास साठे येस. तर या लोके स्वताना इकास कराले देखतस. कथाईन गाव, समाज अन राष्ट्र ना इकास व्हयीन .

रामदास भाऊ, आपल्या व्याहीच्या गावात घडलेल्या विकास कामातील भ्रष्टाचाराची घटना बस स्टॉप वरील सर्वांना सांगत होते. बाहेर रिमझिम पाऊस सुरू होता. बस स्टॉप वर सोमा अप्पाच्या टपरीवर गुळाचा चहा घेत, रावसाहेब तात्या, उदानाना आणि रामदास भाऊंच्या गप्पा सुरु होत्या. उदानानांनी आषाढी वारीचा अनुभव सांगून वातावरण भक्तीमय केलं.

रावसाहेब तात्या म्हणाले की, वारीचा आनंद मनाला व शरीराला ऊर्जा देतो. आषाढ महिन्यात लाखो वारकरी पांडुरंगाच्या भेटीला पंढरपूरकडे देहभान विसरुन जातात. निस्वार्थी भावनेतून वारीचा सोहळा अविरत सुरु आहे. आपल्या समाजाला जागृत करण्यासाठी नितीवान बनवण्यासाठी, संतांनी आपल्या अभंग रचनेच्या माध्यमातून विविध दृष्टांतातून, उदाहरणातून मानवी जीवनाचं मोल सांगीतलं आहे. त्रिकाला बाधित सत्य संतांच्या वाणीतून अनुभवायला मिळत आहे.

मात्र सध्या देशात अनेक ठिकाणी, सरकारी



**बसस्टॉप वरील गप्पा**

कामात सोयीस्कर भ्रष्टाचार सुरु आहे. तो बंद करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. गाव विकासात, भ्रष्टाचारी अडथळा निर्माण करतात. याचा परिणाम विविध ठिकाणी राजकीय वैमनस्य तयार होऊन सामाजिक सुरक्षेला एकतेला बाधा पोहोचते यासाठी समाजातील सर्वांनी प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक आहे. रावसाहेब तात्यांच्या मुद्द्याशी उद्यानांना आणि रामदास भाऊंनी सहमती दर्शविली.

उदानाना म्हणाले की, आपली लोकशाही शासन व्यवस्था से. पन बराच लोके समाज मा हुकुमशाही वातावरन तयार करतस. आपला भाग मा, दिन मा खून, दरोडा, अपहरन न्या घटना घडी ऱ्हायन्यात. नैसर्गिक साधन संपत्तीना चोर लुटारुस्ले कोना धाक ऱ्हायेल नयी. कसामान मसामा अंधा घोडा तमासामा असा प्रकार वाढी ऱ्हायनात. पुल तुटी ऱ्हायना, रस्ता खची ऱ्हायना अन भ्रष्टाचारा माती ऱ्हायना. मती बिघडेल लोकेस्ना हावू मातेल भ्रष्टाचार, एकदिन देश अन समाजनी माती करी टाकी .

उदानानांची सामाजिक तळमळ पाहून, रामदासभाऊ म्हणाले की, लोकशाही समृध्द करानी गरज से. बराच गावेस्मा सरकारी योजना मा बोगस कामे करनारास्नी संख्या वाढी जायेल से. याना साठे समाजमा संत विचारनी गरज से. ''जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती, देह कष्टविती परोपकारी याना अनुभव येवानी गरज से.

रामदास भाऊंचा विचार सर्वांना आवडला. आपलं गाव भ्रष्टाचार मुक्त कसं राहील यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे असे मत रावसाहेब तात्यांनी मांडलं. गावाच्या दर्शनी भागात भिंतीवर मी भ्रष्टाचार करणार नाही, भ्रष्टाचार होऊ देणार नाही असे प्रबोधनात्मक वाक्य लिहावे लागतील असा विचार सर्वांनी केला.



एकनाथ लक्ष्मण गोफणे
चाळीसगाव
मो. ८२७५७२५४२३

# कॉलेस्टेरॉलचं प्रमाण वाढवतात 'हे' पदार्थ

कोलेस्टेरॉल (Cholesterol) हा एक असा पदार्थ आहे, जो शरीरासाठी चांगला आणि वाईट दोन्ही आहे. यामुळेच याला चांगले कोलेस्ट्रॉल आणि वाईट कोलेस्ट्रॉल अशा दोन नावांनी ओळखले जाते. चांगल्याला एचडीएल (हाय डेन्सिटी लिपोप्रोटीन) आणि बॅडला एलडीएल (लो डेन्सिटी लिपोप्रोटीन) म्हणतात. शरीराच्या चांगल्या कार्यासाठी चांगले कोलेस्टेरॉल आवश्यक असते, तर खराब कोलेस्टेरॉल वाढल्याने अनेक गंभीर जीवघेणे आजार होऊ शकतात.

जेव्हा रक्तवाहिन्यांमध्ये या मेणासारख्या पदार्थाचे प्रमाण वाढते तेव्हा ते रक्त प्रवाह कमी होण्याची शक्यता असते. ज्यामुळे हृदयरोग, हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघाताचा धोका वाढतो. यकृत प्रत्यक्षात ते तयार करते परंतु आपण जे पदार्थ खातो ते देखील त्याचे प्रमाण वाढवते. आम्ही तुम्हाला अशाच काही खाद्यपदार्थांबद्दल सांगत आहोत, ज्यामुळे एलडीएल म्हणजेच खराब कोलेस्ट्रॉल वाढते. हृदय निरोगी ठेवायचे असेल तर त्याचे सेवन टाळावे.

**प्रोसेस्ड मीट** – क्लीव्हलँड क्लिनिकच्यानुसार बाजारात उपलब्ध असलेले फ्रोजन आणि पॅकेज केलेले मांस अधिक काळ निरोगी ठेवण्यासाठी त्यांना दीर्घ प्रक्रियेतून जावे लागते. सॉसेज, हॉट डॉग, बेकन, फ्रोझन कबाब इत्यादी प्रक्रिया केलेल्या मांसाची काही उदाहरणे आहेत. यामुळे रोगप्रतिकारकशक्ती कमकुवत होऊ शकते. म्हणून



शक्यतो अशा पदार्थांचा आहारात समावेश करू नका.

**जंक फूड** – जंक फूड हे वेगवेगळ्या प्रकारचे तेल, मसाले आणि मैद्यापासून बनवले जाते, जे कोलेस्ट्रॉल वाढवण्याचे काम करतात. या पदार्थांमध्ये चिप्स, नाचोस, मिल्क चॉकलेट, सोडा, फळांची चव असलेली पेये इत्यादींचा समावेश आहे.

**फ्राय फूड** – हार्वर्ड हेल्थच्या रिपोर्टनुसार तेलात तळलेले पदार्थ तुमच्या आरोग्यासाठी आणि कोलेस्ट्रॉलसाठी खूप वाईट असतात. या पदार्थांमुळे लठ्ठपणाही येतो. तळलेले अन्न प्रत्येकासाठी हानिकारक आहे.

**गोड पदार्थ** –शर्करायुक्त पदार्थांमध्ये साखरेचे प्रमाण जास्त असते आणि त्यामुळे कोलेस्ट्रॉल वाढण्याचा धोका असतो. आइस्क्रीम, केक, पेस्ट्री, डोनट्स इत्यादी पदार्थ टाळावेत. या सर्व गोष्टी हृदयासाठी घातक आहेत.

**फास्ट फूड** –फास्ट फूडचा ट्रेंड झपाट्याने वाढला आहे. त्यामध्ये शरीराला हानी पोहोचवणारे सर्व घटक असतात. हे शरीरातील खराब कोलेस्ट्रॉल झपाट्याने वाढवतात. ते तुम्हाला लठ्ठपणा, हृदयरोग, मधुमेह इत्यादींचा धोका देखील देतात.

**लोकशाही**

**संपादकीय**

## विद्यार्थी मृत्यूच्या चौकशी बरोबरच शाळा व्यवस्थापनाचीही चौकशी हवी



**शुक्रवार दिनांक ११ जुलै २०२५ रोजी जळगाव शहरातील आर आर विद्यालय येथील नववीच्या वर्गात शिकणाऱ्या कल्पेश इंगळे (वय १५) या विद्यार्थ्याच्या झालेल्या गूढ मृत्यू बाबत पोलिसांमार्फत कसून चौकशी व्हावी अशी मागणी आता अनेक पालकांकडून होत आहे. या विद्यार्थ्यांच्या मुलाबरोबरच ज्या शाळेत कल्पेश शिकतो त्या शाळेतील व्यवस्थापनाची ही चौकशी झाली पाहिजे. कारण दुपारी तीन वाजेच्या जेवणाच्या सुट्टीत कल्पेश खेळत असताना तो चक्कर येऊन खाली पडला. त्यानंतर त्याला शाळा व्यवस्थापनातर्फे एका खाजगी रुग्णालयात त्याला उपचारार्थ नेण्यात आले असता तेथील डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले, असे शाळा व्यवस्थापनाचे म्हणणे आहे. तथापि मृत कल्पेश इंगळेच्या आई वडिलांनी 'त्याचा खेळताना नव्हे तर विद्यार्थ्यांनी केलेल्या मारहाणीत मृत्यू झाला' असल्याचा दावा केल्यानंतर तसेच या मृत्यूची चौकशी होत नाही तोपर्यंत आम्ही त्याचे प्रेत अंत्यसंस्कारासाठी ताब्यात घेणार नाही, असा पवित्रा घेतला होता. तेव्हा या घटनेची पोलीस फिर्याद दाखल झाली. शाळेत असलेले सीसीटीव्ही फुटेज वरून याचा तपास करावा, अशी मागणी आई-वडिलांनी केली. दरम्यान पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाल्यानंतर शाळेतील सीसीटीव्ही कार्यरत नसल्याचे पोलिसांना आढळून आले आहे. त्याचबरोबर कल्पेश चा ज्या ठिकाणी टॉयलेट जवळ मृत्यू झाला त्या भागात सीसीटीव्ही नसल्याचे निष्पन्न झाले आहे. म्हणजे शाळा व्यवस्थापनातर्फे जे सीसीटीव्ही लावण्यात आले आहेत, ते बंद असून टॉयलेटकडील भागात तर सीसीटीव्हीच नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे सीसीटीव्हीच्या फुटेज वरून घटनेची माहिती मिळणेच आता शक्य नाही. परिणामी आता कल्पेश च्या मृत्यू संदर्भात चौकशी ही विद्यार्थ्यांच्या जबाब नोंदवून, तसेच शाळा व्यवस्थापन व शिक्षकांचा जबाब घेऊन चौकशीचा निष्कर्ष काढावा लागणार आहे. त्यामुळे कल्पेश इंगळे या विद्यार्थ्याच्या मृत्यूची खरी माहिती मिळवण्यास पोलिसांना सुद्धा अडचणी निर्माण होणार आहेत. ज्या शाळेत कल्पेश चा मृत्यू झाला त्या शाळेत व्यवस्थापनाने सीसीटीव्ही चालू आहेत. की नाही याबाबत कधी पाहणी केली की नाही? शोभेसाठी सीसीटीव्ही बसवण्यात आले होते का? तसेच बसवलेले सीसीटीव्ही बंद असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले की नाही? त्याचबरोबर टॉयलेटकडील भागात सीसीटीव्ही न बसवण्याचे कारण काय? कारण टॉयलेट मध्ये सुद्धा अनेक गंभीर घटना घडतात, हे शाळा व्यवस्थापनाला माहीत नाही काय? संबंधित संस्थाचालक शाळा चालविण्यातून कमाई करतात. त्यांच्यासाठी ते चराऊ कुरण आहे, असे आरोप होत आहेत. मग सीसीटीव्ही सर्वत्र बसविणे तसेच ते सक्षमपणे कार्यरत ठेवण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापनाची नाही काय?**

**बुलढाणा जिल्ह्यातील कठोरा येथील मूळ रहिवासी असलेला कल्पेश हा विद्यार्थी कासमवाडीत आपले आई-वडील बहिण व लहान भावाबरोबर राहतो. आज कल्पेश च्या मृत्यूमुळे इंगळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृत कल्पेशच्या आई-वडिलांनी त्याचा चक्कर येऊन पडल्याने नव्हे तर विद्यार्थ्यांच्या मारहाणीमुळे मृत्यू झाला हा दावा केला नसता तर कल्पेशचा मृत्यू चक्कर येऊन पडल्याने झाला म्हणून या गंभीर घटनेची विल्हेवाट लावली असती. शाळा व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणा सुद्धा यामुळे स्पष्टपणे समोर आला. सीसीटीव्ही बंद असल्यामुळे शाळा व्यवस्थापनाची भांबेरी उडाली आहे. कुठलाही यंत्राकडून योग्य खरी माहिती मिळवण्यासाठी त्या यंत्राची योग्य हाताळणी करणे आवश्यक आहे. अलीकडे शाळेतील विद्यार्थ्यांवर अत्याचाराच्या घटना घडत असल्यामुळे शाळेत सीसीटीव्ही असणे अत्यावश्यक झाले आहे. आर आर विद्यालय व्यवस्थापनाने सीसीटीव्ही लावले, पण ते बंद का होते? याची सुद्धा चौकशी होण्याची गरज आहे. आज कुणाही पालकांच्या पाल्याचा मृत्यू झाला तर त्याची गंभीरता हे ज्याच्यावर हे बेतले आहे त्यालाच कळते. पालक शाळेत विद्यार्थी व शाळा व्यवस्थापनाच्या तसेच शिक्षकांच्या भरवशावर आपल्या पाल्यांना पाठवत असतात. परंतु शाळेचे व्यवस्थापन जर ढिसाळ असेल तर पालकांनी विश्वास कुणावर ठेवावा? असा प्रश्न उपस्थित हो.तो शाळेतील तरुण विद्यार्थी त्यांच्या तारुण्याप्रमाणे खेळतात, वागतात, भांडतात. तथापि या विद्यार्थ्यांचे शाळेतील खरे पालक तेथील शिक्षक आणि शाळा व्यवस्थापनाचे सदस्य हेच असतात. विशेष म्हणजे त्यामुळेच कल्पेश इंगळे या विद्यार्थ्यांच्या मृत्यूची कसून चौकशी झालीच पाहिजे. तथापि शाळा व्यवस्थापनाची ही सखोल चौकशी झाली पाहिजे...!**

# गरजू विद्यार्थ्यांना सुलभ शिक्षणासाठी सायकल देणार !

**आमदार राजुमामा भोळे यांची घोषणा : वुमेन्स अँड चाईल्ड केअर प्लसतर्फे ५०० गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप**

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

वुमेन्स अँड चाईल्ड केअर प्लस ही संस्था कष्टकरी महिला आणि त्यांच्या पाल्यांसाठी उल्लेखनीय कार्य करत आहे. या संस्थेच्या कार्याची दखल घेत आमदार राजुमामा भोळे यांनी एक महत्त्वपूर्ण घोषणा केली. शाळा लांब असलेल्या आणि गरजू विद्यार्थिनींना सुलभ शिक्षणासाठी सायकल पुरविण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. रविवारी वुमेन्स अँड चाईल्ड केअर प्लस या संस्थेच्यावतीने गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. आधार जेष्ठ नागरिक संघ यांच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात ५०० विद्यार्थ्यांना वह्या वितरित करण्यात आल्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शहर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक सागर शिंपी, जैन ब्रदर्स तर्फे पी.एस. नाईक, मनपा आरोग्य विभागाचे उपायुक्त उदय पाटील, महिला व बालकल्याण अधिकारी विजयसिंह परदेशी, आधार जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष संभाजीराव देसाई आणि अध्यक्षस्थानी आमदार राजुमामा भोळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेच्या अध्यक्षा सौ. शांता वाणी यांनी



संस्थेच्या कार्याचा परिचय देत जैन ब्रदर्स तर्फे गरजू विद्यार्थ्यांना वह्या पुरविल्याबद्दल अशोकभाऊ जैन यांचे आभार मानले. तसेच संस्थेचा उद्देश केवळ शैक्षणिक मदत न करता चांगले संस्कारयुक्त नागरिक घडविण्याचा असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी आपल्या भाषणात आमदार राजुमामा भोळे म्हणाले, "विद्यार्थ्यांनी खूप शिकले पाहिजे आणि चांगले संस्कार घेतले पाहिजेत. आई-वडील, शाळा, शहर, राज्य आणि देशाचे नाव उज्वल करण्याचे कार्य त्यांनी केले पाहिजे. मी नेहमी तुमच्यासोबत आहे, तुम्ही केव्हाही माझ्याकडे येऊ शकता," असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले. पाहुण्यांनी आपल्या भाषणांतून संस्थेच्या कार्याचे कौतुक केले आणि विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमलता कुलकर्णी यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय अर्चना पाटे यांनी करून दिला. शेवटी शालिनी चौधरी यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सरला सूर्यवंशी, तनुजा चोपडे, श्यामल शिंदे, छाया पाटील, ज्योती दातेराव, सुनीता महाजन, चंद्रकला पाटील, संगीता पाटील, भारती पाटील, पूजा पंडित, कामिनी पांडे, वंदना पांडे, रुपाली पवार, प्रणाली नेवे, साक्षी सूर्यवंशी, नीता गुरव, समाधान पवार तसेच जेष्ठ नागरिक सभासद यांनी मेहनत घेतली.

## किलबिल बालक मंदिरात पालक सभा



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचालित किलबिल बालक मंदिर (सांस्कृतिक केंद्र) जळगाव. शाळेमध्ये दिनांक १२ जुलै शनिवार रोजी नर्सरी या वर्गाची "पालक सभा" घेण्यात आली. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून धनश्री फालक उपस्थित होत्या. तसेच नर्सरी वर्गाचे ७० पालक सभेला उपस्थित होते. किलबिल शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना नेमाडे यांनी प्रास्ताविक सादर केले. तसेच धनश्री फालक यांनी पालकांना मुलांचा सामाजिक, बौद्धिक, आणि शारीरिक विकास कसा घडवून आणावा, यावर मार्गदर्शन केले. वर्गशिक्षिका कुंदा भारंबे यांनी अभ्यासा विषयी माहिती सांगितली. यावेळी सूत्रसंचालन रत्ना नेमाडे यांनी केले, तर प्रतिभा जोशी यांनी आभार प्रदर्शन केले. तसेच या सभेला शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले आणि पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

## जामनेर न्यायालयाला मिळणार नवीन इमारत

**मंत्री गिरीश महाजन यांचे आश्वासन : वकील संघाने घेतली भेट**

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जामनेर** प्रतिनिधी

जामनेर न्यायालयाला लवकरच नवीन इमारत मंजूर करणार असल्याचे आश्वासन मंत्री गिरीश महाजन यांनी जामनेर वकील संघाला दिले. साक्ष सुरू असताना आरोपीच्या डोक्यात पंखा पडल्याची घटना नुकतीच घडली होती. या घटनेनंतर वकील संघाने मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे नवीन इमारतीची मागणी केली. जामनेर न्यायालयात साक्ष सुरू असताना आरोपीच्या डोक्यात पंखा पडून तो जखमी झाल्याची घटना नुकतीच घडली होती आहे. जामनेर न्यायालयाची जुनी इमारत पाडून नवीन इमारत बांधून मिळावी अशी मागणी जामनेर तालुका वकील संघातर्फे मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे करण्यात आली. त्यावेळी मंत्री गिरीश महाजन यांनी संबंधित विभागाला सूचना करीत आवश्यकता कागदपत्रांच्या पूर्ततेचे आदेश दिले. यावेळी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. के.पी.बारी, सचिव ॲड. डी.बी. गोतमारे, सरकारी वकील ॲड. रूपाली चव्हाण यांच्यासह वकील संघाचे सदस्य उपस्थित होते.



**महिला कक्ष स्थापन करा!**

जामनेर न्यायालयात महिला वकिलांची संख्या दखलपात्र आहे; असे असताना स्वतंत्र महिला वकील कक्ष नाही. त्यामुळे वकील महिलांना अनेक अडचणी येतात. ही बाब वकील महिलांनी यावेळी मंत्री गिरीश महाजन यांचे निदर्शनास आणून दिली. महिला वकीलांसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करावा अशी मागणी करण्यात आली आहे.

## पाण्याचा हौद तुटल्यामुळे गुरांची भटकंती

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**कुऱ्हा ता. मुक्ताईनगर** प्रतिनिधी

निमखेडी बुद्रुक येथील ग्रामपंचायत ने १५ वित्त आयोगातून एका हौदावर ४० हजार रुपये दुरुस्ती खर्च केलेला आहे. एवढा मोठा गुरांच्या पाण्याच्या हौदावर खर्च केलेला असताना सुद्धा ग्रामपंचायत या मालमत्तेच नुकसान करणाऱ्यावर कारवाई करत नसेल तरी कारवाई कोण करेल? हा प्रश्न पशुपालन कर्त्यांमध्ये चर्चेचा झाला आहे. ग्रामपंचायतच्या दुर्लक्षामुळेव अकार्यक्षतेमुळे हा प्रकार झालेला असल्याचं नागरिकांमध्ये बोलल्या जात आहे. निमखेडी बुद्रुकयेथील ग्रामपंचायती ने गुरांच्या पिण्यासाठी बांधण्यात आलेला हौद दिनांक १३ /७/ २०२५ रोजी अज्ञात वाहनाच्या पाणी भरणाऱ्यांच्या मुळे हौद तुटला आहे अशी जनमानसात चर्चा सुरू आहे. तरीपण ग्रामपंचायत कार्यालयाकडून आतापर्यंत कुठलीच चौकशी केली नसल्याचे दिसून येत आहे. ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांचा हा निष्काळजीपणा नाही का? या प्रकाराला जबाबदार कोण? अशा बेजबाबदार पदाधिकाऱ्यावर शासनाने कारवाई करण्यात यावी अशी मागणी पशुपालन व्यवसायिक करीत आहे.



निमखेडी बुद्रुक येथे पशुपालन जनगणनेनुसार पशुपालन ची एकूण संख्या १४९६ एवढी आहे. यात गाय ६१६, बैल २४५ तर बकऱ्या ६३५ आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने या हौदावर दररोज सकाळ संध्याकाळ पाणी पिण्यासाठी येत असतात. मात्र या प्रकारामुळे त्यांना वणवण भटकावे लागत आहे.

## भरधाव बसची थेट संरक्षण भिंतीला धडक

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**बोईसर** प्रतिनिधी

बोईसर बस आगारात बसचा भीषण अपघात झाल्याची घटना घडलीय. या अपघातात बस चालक गंभीर जखमी झालाय. मिळालेल्या माहितीनुसार, बस चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने भरधाव बस आगाराच्या संरक्षण भिंतीला धडकली. या अपघातात चालक आदिनाथ कुटे गंभीर जखमी झालेत. जखमी बस चालकावर बोईसरमधील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुदैवाने बसमध्ये प्रवासी नसल्याने मोठी दुर्घटना टळली. बसचा अपघात घडल्यानंतर आगारात बघ्याची मोठी गर्दी जमली होती. बस चालकाला गंभीर दुखापत झाली असून रस्त्यावर रक्ताचा सडा पडल्याचं दिसून आले. दरम्यान गेल्या काही दिवसांपासून महामंडळाच्या बसेसच्या अपघाताच्या घटना वारंवार होताना दिसत आहे. नादुरुस्त बस रस्त्यावर धावत असल्यानं अपघात होत असल्याचं निदर्शनात येत आहे.

## होमिओपॅथी डॉक्टरांचे आमदारांना निवेदन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पारोळा** प्रतिनिधी



राज्य सरकारने नुकत्याच घेतलेल्या निर्णयामुळे एक लाखांहून अधिक होमिओपॅथी डॉक्टरांत तीव्र नाराजी चे वातावरण आहे. महाराष्ट्रातील होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथी उपचार करण्यासाठी दिलेली परवानगी व त्यासंदर्भातील एमएमसी रजिस्ट्रेशन प्रक्रिया सरकारने अचानक थांबवल्यामुळे डॉक्टर्सनी आझाद मैदानात १६ जुलै २०२५ पासून आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की २०१४ साली झालेल्या कायदेशीर सुधारणांनुसार, बी एच एम एस पदवीधरांकाना एमबीबीएस कॉलेजमध्ये एक वर्षाचा सीसीएमपी सि सि एम पी कोर्स पूर्ण केल्यानंतर ॲलोपॅथीची वैद्यकीय सेवा देण्याची परवानगी देण्यात आली होती. या निर्णयाला मंत्रिमंडळ आणि विधानमंडळ दोन्ही सभागृहांची मंजुरी मिळालेली आहे. तसेच महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल अधिनियम १९६५ मध्ये सुधारणा करून या डॉक्टरांची शेड्युल २८ अंतर्गत स्वतंत्र नोंदणीची व्यवस्थाही मान्य करण्यात आली होती. परंतु गेल्या दहा वर्षांत या नोंदणी प्रक्रियेस विलंब होतच होता. अखेर १५ जुलै २०२५ पासून नोंदणी सुरू होणार होती, अशी अपेक्षा होती. मात्र, अचानक सरकारने नोंदणी प्रक्रिया थांबवण्याचा निर्णय घेतला. यामागे ॲलोपॅथी डॉक्टरांच्या संघटना आय एम ए कडून दिल्या गेलेल्या दिशाभूल करणाऱ्या माहितीस जबाबदार धरले जात आहे. सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील एक लाख होमिओपॅथी डॉक्टरांच्या भविष्यावर टांगती तलवार आली आहे. या अन्यायाच्या विरोधात, होमिओपॅथीक कौन्सिलचे प्रबंधक डॉ. बाहुबली शाह यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरातील हजारो डॉक्टर १६ जुलैपासून मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषण करणार आहेत. १६, १७ व १८ जुलै रोजी हे आंदोलन अधिक तीव्रकरण्याचा डॉक्टर असोसिएशन कडुन सांगितले जात आहे डॉक्टरांनी केलेल्या मागणीनुसार शासनाने तत्काळ सि सि एम पी कोर्स पूर्ण केलेल्या डॉक्टरांचे एमएमसीमध्ये रजिस्ट्रेशन सुरू करावे आणि रद्द केलेले एफडीए परिपत्रक मागे घ्यावे. यासोबतच, विधिमंडळाच्या अधिवेशनात यासंदर्भात प्रश्न उपस्थित करावा व रद्द निर्णय मागे घेण्यास शासनावर दबाव आणावा, अशीही मागणी या निवेदना द्वारे करण्यात आली आहे. निवेदन देते वेळी अध्यक्ष डॉ. किरण पाटील, उपाध्यक्ष डॉ. निलेश चोरडिया, सचिव, डॉ, ज्ञानेश्वर पाटील, डॉ. ए. आय. शाह, डॉ. पी. के. पाटील, डॉ. गणेश पाटील, डॉ. प्रकाश काटे, डॉ. विशाल शेंडे, डॉ. रवींद्र धनराळे उपस्थित होते.

**ग्रामपंचायत खेडगाव नं. ता.पाचोरा जि.जळगाव**

**ई- निविदा सुचना क्र.३ सन २०२५/२६ (प्रथम वेळ)**

सरपंच, ग्रामपंचायत खेडगाव नं. ता.पाचोरा जि.जळगाव हे जळगाव जिल्हा परिषदेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन online percentage rate tender दोन लिफाफा पध्दतीने १५ वा वित्त आयोग अंतर्गत पुढील कामाची ई- निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रुपये | बयाना रक्कम रु. (परतावा) | निविदा फी रक्कम रु. | आवश्यक ठेकेदार वर्ग | काम पुर्ण करणेची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे खेडगाव नं. ता.पाचोरा येथे नविन पाईप लाईन टाकणे. (५०७६१७२१) | २,९९,४१३/- | - | १००/- | वर्ग ७ व त्यावरील | ६ महिने |
| | मौजे खेडगाव नं. ता.पाचोरा येथे जि.प.शाळा दुरुस्ती करणे. (१११६१४४६३) | १,४९,२६५/- | | | | |
| | एकुण | ४,४८,६७८/- | | | | |

वरील कामाची निविदा प्रपत्रे https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.सदर निविदा प्रपत्रे,अटी,शर्ती इ.सदर संकेतस्थळावर दिनांक १५/०७/२०२५ रोजी ०९.०० वाजेपासुन दिनांक २२/०७/२०२५ रोजी १७.०० वाजेपर्यत अधिग्रहीत (Download) करता येतील. व इलेक्ट्रानिक फॉरमॅट मध्ये ऑनलाईन पध्दतीने सादर करता येतील.ऑनलाईन सादर केलेल्या ई निविदा **दिनांक २३/०७/२०२५ रोजी १७.०० वा.**ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.सदर दिवशी ई निविदा उघडणे शक्य न झाल्यास कार्यालयाच्या वेळेच्या सोईनुसार पुढील शक्य त्या दिवशी उघडण्यात येतील.

**सरपंच**
**ग्रामपंचायत खेडगाव नं.**
**ता.पाचोरा जि.जळगाव**

**BRIEF TENDER NOTICE**

**NOTICE INVITING E-TENDER NO.01/2025-26**

Sarpanch/VDO/Gramsevak, Village Panchayat Dist. Jalgaon.(MS)as mention below invites online Item rate tender for Various Construction Material or percentage rate from registered suppliers or contractor in behalf of Dy.Chief Executive Officer (V.P.) Zilla Parishad, Jalgaon.

| Sr No | Village Panchayat | Name of Work | EMD | Tender Fee | Estimated Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Hingone Kh | Providing Nadep Compost At Hingone Kh Ta Chalisgaon Dist Jalgaon | - | - | 1,24,650/- |
| 2 | Hingone Kh | Constructing Sagreation Shed Under Solid Waste Managements System At Hingone Kh Ta Chalisgaon Dist Jalgaon | - | - | 1,50,000/- |
| 3 | Hingone Kh | Providing MS Jali For Water Supply Well At Hingone Kh Ta Chalisgaon Dist Jalgaon | - | - | 49,855/- |
| 4 | Hingone Kh | Providing Pipeline Machinery And Repairs To Pump House At Hingone Kh Ta Chalisgaon Dist Jalgaon | - | - | 80,000/- |
| 5 | Hingone Kh | Constraction Of Public Latrin Unit No.1 At Hingone Kh Ta Chalisgaon Dist Jalgaon | - | - | 2,99,989/- |
| 6 | Hingone Kh | Constraction Of Public Latrin Unit No.2 At Hingone Kh Ta Chalisgaon Dist Jalgaon | - | - | 2,99,989/- |
| 7 | Deshmukhawadi | Construction Of Underground Gutter At Deshmukhawadi Ta Chalisgaon Dist Jalgaon | - | - | 93,484/- |
| 8 | Deshmukhawadi | Constructin Of Cement Concrete Road At Deshmukhawadi Ta Chalisgaon Dist Jalgaon | - | - | 91,874/- |
| 9 | Deshmukhawadi | Constructin Of Cement Concrete Road At Deshmukhawadi Ta Chalisgaon Dist Jalgaon | - | - | 1,75,000/- |
| 10 | Aadgaon | Constraction Of Public Toilet Unit No.1 And Unit No.2 Under 15 Fc And SBM At Aadgaon Tal Chalisgaon Dist Jalgaon | - | - | 3,00,000/- |
| 11 | Aadgaon | Constraction Of Public Toilet Unit No.2 And Unit No.2 Under 15 Fc And SBM At Aadgaon Tal Chalisgaon Dist Jalgaon | - | - | 3,00,000/- |

**General Terms and Condition-**

1. The complete bidding process will be **online (E-tendering)**
   **All the notifications / Corrigendum and changes regarding this tender notice hereafter will be published online on website http://mahatenders.gov.in**
2. **Bidding document for work can be seen and downloaded from the website "http://mahatenders.gov.in" from 09:00 hours on Dt 14/07/2025 to Dt 21/07/2025 up to 17:00 hours**
3. **The bid can be submitted in electronic format on the website "http://mahatenders.gov.in" for work 09:00 hours on Dt 14/07/2025 to Dt 21/07/2025 up to 17:00 hours**
4. **Technical Bid will be opened for work on Dt 23/07/2025 at 09:00 hours on website http://mahatenders.gov.in" in the Office of the Village Panchayat respectively Dist. Jalgaon**
5. The guidelines to download the tender document and online submission of bids and Procedure of tender opening can be downloaded from website http://mahatenders.gov.in

**ग्रा.पं.अधीकारी /सरपंच,**
**ग्रामपंचायत कार्यालय**
**जि जळगाव**

दैनिक लोकशाही 'लोक'राज्य neXt

६ जळगाव, मंगळवार दि. १५ जुलै २०२५ epaper.lokshahilive.com

# सोन्यावरील कर्जासाठी आता नवीन नियम!

**मुंबई :** ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने एक मोठे पाऊल उचलले आहे. आता शेती कर्जासाठी २ लाख रुपयांचे सोने आणि चांदी गहाण ठेवता येईल. होय, शेतकरी आणि लघु उद्योजकांना आता सहज कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आता अशी लोक सोने किंवा चांदी गहाण ठेवून शेती आणि एमएसएमई कर्ज घेऊ शकतात. याआधी काहीही तारण न ठेवता कर्ज घेण्याची मर्यादा होती पण, आता कोणी स्वतःहून सोने किंवा चांदी तारण ठेवू इच्छित असेल तर बँक त्याला नकार देऊ शकत नाही, असा आदेश जारी केला आहे. रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयाचा सर्वाधिक फायदा ग्रामीण भागातील शेतकरी आणि लहान व्यावसायिकांना होईल. आरबीआयने परिपत्रक जारी करून म्हटले की शेतकरी किंवा व्यावसायिकाने स्वेच्छेने असे केल्यास बँका २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी सोने आणि चांदी गहाण ठेवू शकतील. एका बँकेच्या अधिकाऱ्याने सांगितले की, या नवीन नियमामुळे जर कोणी त्याचे सोने किंवा चांदी गहाण ठेवली तर त्याला काहीही गहाण न ठेवता कर्ज घेण्याच्या फायद्यापासून वंचित ठेवले जाणार नाही याची खात्री होईल.

लोक लाईव्ह BREAKING NEWS



## रेल्वेच्या प्रत्येक डब्यात सीसीटीव्ही बसवणार!

नवी दिल्ली : भारतीय रेल्वेने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी मोठा निर्णय घेतला आहे. लवकरच देशातील सर्व लांब पल्ल्यांच्या गाड्यांमधील ७४ हजार डब्यांमध्ये आणि १५ हजार इंजिनांमध्ये अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जाणार आहेत. सध्या केवळ वंदे भारत, अमृत भारत आणि वंदे मेट्रो गाड्यांमध्येच सीसीटीव्ही यंत्रणा उपलब्ध आहे, पण लवकरच संपूर्ण देशभरातील सर्व रेल्वे गाड्यांमध्ये ही सुविधा लागू होणार आहे. सध्या ही यंत्रणा प्रायोगिक स्वरूपात उत्तर रेल्वेमध्ये वापरली जात होती आणि त्याचे परिणाम सकारात्मक आढळले. प्रवाशांच्या गोपनीयतेचा विचार करताना, कॅमेरे केवळ डब्यांच्या सामान्य हालचाली क्षेत्रात (दरवाज्याजवळ) लावले जाणार आहेत. यामुळे डब्यांमधील खासगी भाग किंवा शयनक्षेत्र सुरक्षित राहील. रेल्वे प्रशासनाने जाहीर केले आहे की हे सर्व कॅमेरे एसटीक्युसी प्रमाणित असतील आणि कमी प्रकाशातही स्पष्ट चित्रफिती मिळतील.

## शस्त्रसंधीसाठी पाकिस्तान सैन्यांकडूनच पुढाकार!

नवी दिल्ली : ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारत आणि पाकिस्तानात चार दिवस सैन्य संघर्ष झाला होता. या संघर्षादरम्यान पाकिस्तानी सैन्याने भारताकडे शस्त्रसंधीचा प्रस्ताव दिला होता, असा दावा भारतातील नव्हे तर पाकिस्तानमधील थिंक टँकने केला आहे. पाकिस्तान-चायना इंस्टिट्यूट (पीसीआय) नावाचा हा अहवाल अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या डोळ्यांत अंजन घालणारा आहे. भारत-पाकमधील शस्त्रसंधी माझ्यामुळे झाल्याचा ट्रम्प यांचा दावाही फोल ठरत आहे. पीसीआय अहवालानुसार, ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारत आणि पाकिस्तानमधील संघर्ष थांबवण्यासाठी पाकिस्तानच्या लष्करी ऑपरेशन्स महासंचालकांनी (डीजीएमओ) स्वतः भारतीय समकक्षांशी संपर्क साधला होता. अहवालातील या माहितीमुळे डोनाल्ड ट्रम्प यांचा मध्यस्थीचा दावाही फेटाळला गेला आहे. हा अहवाल अमेरिकेच्या प्रतिष्ठेला गंभीर धक्का देणारा आहे.

## मतदार याद्यांची होणार कसून तपासणी

नवी दिल्ली : बिहारप्रमाणेच पुढील महिन्यापासून संपूर्ण देशभरात मतदार यादी सुधारणा मोहीम राबवली जाणार आहे. यामध्ये मतदारांची सखोल पडताळणी केली जाईल. यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने आपली यंत्रणा सक्रिय केली आहे. परदेशी बेकायदेशीर स्थलांतरितांना मतदार यादीतून काढून टाकण्यासाठी ही मोहीम देशभरात राबवली जाईल. या वर्षी बिहारमध्ये निवडणुका होणार आहेत. तर आसाम, केरळ, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका २०२६ मध्ये होणार आहेत. त्यापूर्वी या राज्यांतील मतदार यादी सुधारणा प्रक्रिया पूर्ण केली जाईल, असे आयोगाचे म्हणणे आहे. सर्वोच्च न्यायालयाने १० जुलै रोजी बिहारमध्ये विशेष सुधारणा मोहिम सुरू ठेवण्याची परवानगी दिल्यानंतर आयोगाकडून हा निर्णय आला. न्यायालयाने ते घटनात्मक घोषित केले होते.



## लसणाची फोडणीही झाली महाग!

मुंबई : मसाले, भाज्या यापाठोपाठ लसणाचाही भाव वाढत आहे. ३०० रुपये प्रति किलोने सध्या मिळणारा लसूण आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे काही गृहिणींनी फोडणीतून लसूण वगळला आहे, तर काहींनी आखडता हात घेतला आहे. बाजारात काही महिन्यांपूर्वी १५०-२०० रुपये किलोने मिळणारा लसूण सध्या जवळपास २०० रुपये किलोने किरकोळ बाजारात मिळत आहे. तर सोललेला लसूण ४०० रुपये किलोने मिळत आहे. लसूण सोलण्यासाठी लागणारा वेळ वाचावा, यासाठी नोकरदार महिला बाजारात सोलून मिळणारा लसूण आवर्जून खरेदी करताना दिसतात.

# 'धरती आबा जनजातीय अभियान' आदिवासींसाठी दिशा!

## पालकमंत्री गुलाबराव पाटील : रिधुर येथे शिबिराचे उद्घाटन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

जसे महसूल खाते 'समाधान शिबिर' राबवते, तसेच हे 'धरती आबा जनजातीय अभियान' आदिवासी बांधवांच्या दारी 'न्याय' घेऊन येत आहे. 'फाईल गहाळ', 'कर्मचारी नाही', 'आज वेळ नाही' हे आता बंद झाले असून, शिबिरातच काम पूर्ण व्हावे, हीच शासनाची भूमिका आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. ते रिधुर येथे आयोजित प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत तालुकास्तरीय शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशातील आदिवासी भागाच्या सर्वांगीण विकासासाठी ७८ हजार कोटींचा निधी मंजूर झाल्याचे त्यांनी सांगितले. हे शिबिर म्हणजे आदिवासींसाठी वरदान असून त्यांच्या भविष्याची दिशा ठरवणारे ठरणार आहे, असेही ते म्हणाले.

या शिबिराचे उद्घाटन पालकमंत्री श्री. गुलाबराव पाटील यांच्या हस्ते आदिवासी स्वातंत्र्यवीर बिरसा मुंडा (धरती आबा) यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. या शिबिराचे आयोजन प्रकल्प अधिकारी अरुण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी पालकमंत्री श्री. पाटील म्हणाले, भिल्ल, पारधी, टोकरे कोळी व इतर अनुसूचित जमातीतील प्रत्येक पात्र लाभार्थ्याला जातीचे प्रमाणपत्र तत्काळ द्यावे, अशा स्पष्ट सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या. 'दारात शिबिर हातात न्याय' या तत्वावर आधारित हे अभियान वैयक्तिक, सामूहिक व पायाभूत सुविधांचा लाभ एकाच ठिकाणी देणारे ठरत आहे. शिक्षणच आदिवासी समाजाच्या उन्नतीचा मार्ग आहे. वाटेल ते करा, पण तुमच्या मुलांना आणि मुलींना शिकवा, असे आवाहनही त्यांनी उपस्थितांना केले. या शिबिराची सुरुवात बजरंगबली मंदिरातील सामूहिक आरतीने झाली. जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर करून उपस्थितांचे स्वागत केले. प्रारंभी प्रास्ताविकात प्रकल्प अधिकारी अरुण पवार यांनी शिबिराचे महत्त्व सांगत केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. सूत्रसंचालन प्रवीण पाटील यांनी तर प्रकल्प अधिकारी अरुण पवार यांच्या



मार्गदर्शनाखाली नियोजन सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रशांत माहुरे, अरुण संदीप, तालुका प्रमुख विजयकुमार गाडे यांनी केले. शिबिरात प्रांताधिकारी विनय गोसावी, तहसीलदार शितल राजपूत, सहाय्यक प्रकल्प अधिकारी संदीप पाटील, जनअप्पा कोळी, आशिष वाघ, शिवराज पाटील, जितू पाटील, स्वाती पाटील, डॉ. सुधीर दुसाने, डॉ. संजीत गुरव, ज्योती कोळी, कैलास जळके, चुडामण पाटील, सुनील कोळी, गुड्डू सपकाळे, तानकु तात्या सूर्यवंशी, लीलाधर सपकाळे, वासुदेव सोनवणे उपस्थित होते.

### दक्ष राहण्याच्या सूचना

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी एकही पात्र लाभार्थी योजना वंचित राहू नये, यासाठी दक्ष राहण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. प्रांताधिकारी विनय गोसावी यांनी भिल्ल, पारधी, टोकरे कोळी समाजातील पात्र लाभार्थ्यांना जातीचे प्रमाणपत्र व महसूल विभागाच्या विविध योजनांचा लाभ मिळणार असल्याचे स्पष्ट केले.

### गोदावरी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचे कौशल्य

# स्वयंचलित सोलर पॅनल क्लिनर रोबोची निर्मिती



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

गोदावरी फाउंडेशन संचलित, गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय येथील अंतिम वर्ष यांत्रिक अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांनी पूर्णपणे स्वयंचलित ऑर्डिनो संचालित सोलर पॅनल क्लिनर रोबो हे नाविन्यपूर्ण प्रकल्पाचे यशस्वी डिझाईन व निर्मिती केली आहे.

हा प्रकल्प प्रा. मयूर पी. ठाकूर, प्रा. किशोर एम. महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आला. तुषार पाटील, वैभव पाटील, यद्नेश ठाकरे, निरज नारखेडे या विद्यार्थ्यांनी सौरऊर्जेच्या क्षेत्रातील एक महत्त्वाचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला. सोलर पॅनलवर धूळ व मळ साचल्यामुळे निर्माण होणारी कार्यक्षमतेत घट होते. त्यांनी तयार केलेला हा रोबो ऑर्डिनो प्रोग्रामिंगच्या सहाय्याने पूर्णपणे स्वयंचलित आहे.

# 'सार्वजनिक आरोग्य क्विझ' चे यशस्वी आयोजन

### हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाविद्यालयाने पटकावला प्रथम क्रमांक

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

आयपीएचए महाराष्ट्र आणि डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालययांच्या संयुक्त विद्यमाने 'सार्वजनिक आरोग्य क्विझ २०२५' ची राज्यस्तरीय फेरी डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज व रुग्णालय येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे (कूपर) वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई येथील स्पर्धकांनी उत्कृष्ट कामगिरी करत 'डॉ. जल मेहता ट्रॉफी' जिंकत प्रथम क्रमांक पटकावला.

या कार्यक्रमात गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. उल्हास पाटील ऑनलाईन सहभागी झाले होते. सचिव डॉ. वर्षा पाटील, डी.एम. कार्डिओलॉजी डॉ. वैभव पाटील, निवृत्त वैद्यकीय संचालक डॉ. एन.एस. आर्विकर, आयपीएचए ट्रेझरर डॉ. नंदकुमार साळुंखे, आयपीएचए उपाध्यक्ष डॉ. प्रशांत सोलंके, समन्वयक डॉ. योगिता बावस्कर,



आयोजन प्रमुख डॉ. दिलीप ढेकळे, कम्युनिटी मेडिसिन विभागप्रमुख यांचा समावेश होता. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व शारदापूजनाने करण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील विविध विभागप्रमुख आणि प्राध्यापकांचीही उपस्थिती होती. डॉ. उल्हास पाटील यांनी महाविद्यालयातील कम्युनिटी मेडिसिन विभागाच्या उपक्रमांचे कौतुक केले. तसेच महाविद्यालय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करण्यास सज्ज असल्याचे सांगत अधिष्ठाता डॉ. प्रशांत सोलंके व त्यांच्या टीमला शुभेच्छा दिल्या. डॉ. नंदकुमार साळुंखे यांनी आयपीएचए क्विझचे महत्त्व उलगडून सांगितले.

### पाच संघांचा सहभाग

स्पर्धेत सामाजिक आरोग्य, महामारी व्यवस्थापन, पोषण, जल स्वच्छता, प्राथमिक आरोग्य सेवा, रुग्णसंख्या नियोजन अशा विविध विषयांवरील प्रश्न विचारण्यात आले. एकूण पाच संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. पाच वेगवेगळ्या फेऱ्यांमधून ही स्पर्धा पार पडली. यामागचा उद्देश म्हणजे सार्वजनिक आरोग्य विषयावर जागरूकता वाढवणे, विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञानातून प्रेरणा देणे व आरोग्यविषयक धोरणांबाबत सजगता निर्माण करणे हा होता.

# शेतकऱ्यांना फक्त 40 रुपयात मिळणार पीकविमा!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पुणे** प्रतिनिधी

पंतप्रधान पीक विमा योजनेत सीएससी केंद्रावर विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी ४० रुपये शुल्क केंद्र सरकारने निश्चित केले आहे. शेतकऱ्यांनी विमा हप्त्याव्यतिरिक्त इतर शुल्क देऊ नये, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. विमा हप्ता भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलै असून, शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी व्हावे, असेही आवाहन विभागाने केले आहे. सर्व पिकांसाठी जोखीमस्तर ७० टक्के आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टीने राज्यात पंतप्रधान पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. पुणे, सोलापूर व अहिल्यानगर जिल्ह्यांत पीक विमा योजना भारतीय कृषी विमा कंपनी मार्फत राबविण्यात येत आहे. खरिपातील भात (धान) ज्वारी, बाजरी, नाचणी (राणी), मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, तीळ, कारळे, कापूस व कांदा या पिकांसाठी शेतकऱ्यांना भाग घेता येईल, असे कृषी विभागाने स्पष्ट केले.

योजनेत भाग घेण्यासाठी ॲग्रिस्टॅक नोंदणी क्रमांक आणि ई- पीक पाहणी बंधनकारक आहे. कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभाग ऐच्छिक आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी ॲग्रिस्टॅक नोंदणी क्रमांक, ७-१२ उतारा, बँक पासबुक, आधार कार्ड आणि पीक पेरणीचे स्वयंघोषणापत्र बँकेत देणे आवश्यक आहे. याशिवाय सामान्य सुविधा केंद्र (सीएससी), आपले सरकार सुविधा केंद्र येथे किंवा https://pmfby.gov.in या पोर्टलवरूनही अर्ज भरता येईल. या अधिक माहितीसाठी केंद्र सरकारच्या १४४४७ या क्रमांकावर संपर्क करावा. अथवा कृषी विभागाच्या https://www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# पावसाळी अधिवेशनासाठी काँग्रेसची मोर्चेबांधणी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** प्रतिनिधी

संसदेच्या आगामी पावसाळी अधिवेशनासाठी पक्षाची रणनीती ठरविण्यासाठी काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी यांच्या अध्यक्षतेखाली उद्या मंगळवार दि. १५ रोजी महत्त्वाची बैठक होणार आहे. या अधिवेशनात विरोधक आणि सरकारमध्ये विविध मुद्द्यांवर संघर्ष होण्याची शक्यता आहे. बिहारमधील मतदारयाद्या, पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर आदी मुद्द्यांवर चर्चा करण्याच्या दृष्टीने या बैठकीत चर्चा होणे अपेक्षित आहे.

# किल्ला, त्रिवेणी संगम व धबधब्याने फुलले नयनरम्य सौंदर्य!

## चोपडा तालुक्यातील चौगाव येथे पर्यटकांची गर्दी : 'ब' दर्जाची मागणी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चोपडा** प्रतिनिधी

पावसाळ्याचे दिवस म्हटले म्हणजे ओले हिरवे दिवस, बहरून आलेला निसर्ग, खळखळ आवाज करीत वाहाणारे ओढे, नाले आणि ओसंडून वाहणारे धबधबे आणि अशातच पर्यटक, निसर्गप्रेमी आणि दुर्ग सेवक यांना वेड लागतं ते गडकोटांचे आणि तिर्थक्षेत्रांचे... खान्देशातील डोंगरी किल्ला म्हणजे चोपड्यापासून अवघ्या बारा कि.मी. चौगाव या खेडेगावापासून चार किमी वर असलेला चौगावचा किल्ला. सध्या येथे पर्यटकांची गर्दी दाटून आली असून शासनाने 'ब' वर्ग द्यावा अशी मागणी होत आहे.

बाराव्या शतकातील अहीर (गवळी) राजांच्या काळात भैरव घाटावर लक्ष ठेवण्यासाठी बांधण्यात आलेला हा किल्ला. हिरवाईने नटलेला सुमारे ९०० वर्षापुर्वीचा हा किल्ला आजही सुस्थितीत आहे. दोन दरवाजे, सप्ततलावांचा समूह, भुयारी मार्ग जे आज दबले गेलेले आहेत. सुमारे दहा गुंठ्यांत आजही तग धरून उभा असलेला गवळी वाडा, तटबंदी, बुरुज, पडक्या अवस्थेत असलेले आई भवानीचे मंदिर आणि शालिवाहन काळातील अखंड दगडात कोरलेल्या लेण्या ही अवशेष आहेत. किल्ल्याच्या बाजूलाच असलेला, डोंगरदऱ्यांच्या कुशीत लपलेला आणि जणू सौंदर्याची खाण असलेला जळगाव



जिल्ह्यातील सर्वात उंच धबधबा जो आज ओसांडून वाहात आहे. पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरू पाहत आहे. किल्याच्या अलिकडे त्याच काळातील पण सन १९२६ मध्ये श्री स्वामी शांतानंद गौरी शंकर महाराज रामटेकवाले यांनी जिर्णोद्धार केलेले महादेवाचे पुरातन मंदिर आहे. त्याच्या बाजूलाच दऱ्याखोऱ्यातून वाहत येणाऱ्या तीन नाल्यांचा संगम आहे. त्याला त्रिवेणी संगम व मंदिराला त्रिवेणी महादेव मंदिर म्हणतात. हिरवाईने नटलेल्या या परीसरात रान हळद, सफेद मुसळी, लाल गुंज,जंगली कांदा, कडूखुळा यासह अन्य आयुर्वेदिक औषधी तर टेंभुर्णी, कटोरले, बेल, हिरडा, बेहडा, आवळा, करवंद, गवळीनचे फळ, धामण इत्यादी रानमेवा चाखायला मिळतो. या परिसरात नीलगाय, अस्वल, मोर, घोरपड,



रानडुक्कर, ससा, कोल्हा, हरीण, वानर, तडस हे जंगली प्राणी आढळतात. सध्या येथे पर्यटकांसाठी दिशा दर्शक पाट्या, बैठक आसन व निरीक्षण मनोरा उभारला जात असले तरी अनेक सुविधांचा अभाव आहे. रस्ता, पिण्यासाठी स्वच्छ पाणी, लाईट, पर्यटकांसाठी निवास, किल्ल्याला पायऱ्या, पडलेले मंदिर, ढासळत चाललेल्या तटबंदी, बुरुज व अवशेष दुरुस्ती होणे आवश्यक आहे. अन्यथा हा ऐतिहासिक वारसा पुढच्या पिढीसाठी शिल्लक राहणार नाही.

### दर्जा वाढविण्याची मागणी

या भागात पावसाळ्यात हजारो पर्यटक, निसर्गप्रेमी येत असतात. किल्ल्याला पर्यटनाचा दर्जा मिळावा व प्रादेशिक पर्यटन विकास विभाग व वन पर्यटनमधून निधी मिळून हा ऐतिहासिक वारसा जपला जावा, चौगाव किल्ल्याची पुरातत्त्व विभागात नोंद व्हावी आणि तिर्थक्षेत्र त्रिवेणी महादेव मंदिर ज्याला तिर्थक्षेत्राचा 'क' दर्जा मिळाला आहे तो आता 'ब' दर्जा मिळावा ही मागणी होतांना दिसत आहे.

हे पत्र लोकशाही इनोवेशन्स प्रायव्हेट लिमिटेड मालकीचे त्यांच्या वतीने मुद्रक, प्रकाशक, संपादिका शांता कमलाकर वाणी यांनी लोकशाही इनोवेशन्स प्राइवेट लिमिटेड एम-१८१, एमआयडीसी जळगाव जिल्हा जळगाव ४२५००२ (महाराष्ट्र) येथून छापून २२०, बळीराम पेठ, जळगाव जिल्हा जळगाव ४२५००१ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले.
This LOKSHAHI newspaper is owned by Lokshahi Innovations Private Limited and printed on its behalf by Shanta Kamalakar Wani, Printer, Publisher, Editor at Lokshahi Innovations Private Limited M-181, MIDC Jalgaon District Jalgaon 425002 (Maharashtra). Published at 220, Baliram Peth, Jalgaon District Jalgaon 425001 Maharashtra.आर.एन.आय.नं MAHMAR/२००९/३३०२८ पोस्टल रजी. नंबर – No.JAL/16/2024-26 EMail- lokshahilive@gmail.com, वर्ष १६ वे. जळगाव फोन नं. ०२५७-२२३७४९१,२२४१४९१,२९७०३६८.
संपर्क कार्यालय: मुंबई- १०, शंकेश्वर सोसायटी, मानपाडा रोड, नवजीवन हॉस्पीटल समोर, डोंबीवली पूर्व जि. ठाणे, मो. नं. ९४२२२८४५११. सहाय्यक संपादक राजेश यावलकर, सल्लागार संपादक धों. ज. गुरव, (पी. आर. बी. कायद्यानुसार) संपादकीय जबाबदारी यांची आहे.